डिजीटल ई-मासिक

# महापशुधन वार्ता

वर्ष १ ले, अंक ४ था माहे ऑगस्ट-२०२५




प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११०६७

डिजीटल ई-मासिक
महापशुधन वार्ता
वर्ष १ ले, अंक ४ था
माहे ऑगस्ट-२०२५

संपादक
**डॉ. प्रशांत भड**
उपआयुक्त पशुसंवर्धन
(पशुधन व कुक्कुट)
पशुसंवर्धन आयुक्तालय,औंध, पुणे-६७

संकलन, मांडणी व सजावट :
**श्री. संतोष पवार,** पशुधन पर्यवेक्षक

## पशुसंवर्धन विभाग

राज्यस्तरीय कॉल सेंटर
संपर्क क्र : १९६२

पत्रव्यवहारासाठी पत्ता :
महापशुधन वार्ता कक्ष
पसं-१३, पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य,
औंध, पुणे - ४११००७

Email: mahapshudhanvarta@gmail.com

## पशुसंवर्धन विभाग

मागील अंक वाचण्यासाठी खालील क्युआर कोड स्कॅन करा

या अंकातील लेखांमध्ये व्यक्त करण्यात आलेल्या मतांशी संपादक व पशुसंवर्धन विभाग सहमत असेलच, असे नाही ( पुणे न्यायकक्षेत ).

प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

सत्यमेव जयते



**श्रीमती पंकजा गोपीनाथ मुंडे**

मंत्री, पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरण
बदल महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२

## !! शुभसंदेश !!

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने पशुसंवर्धन व्यवसायास कृषि समकक्ष दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेत राज्यातील लाखो पशुपालकांना मोठा दिलासा दिला आहे. या धोरणात्मक सुधारणेमुळे दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन व वराहपालन व्यवसाय करणाऱ्या पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार असून, त्यांना नव्या विविध सवलतींचा लाभ होणार आहे.

पशुपालकांना भेडसावणाऱ्या कृषि वीज दराच्या तुलनेत जास्त वीज दर, सोलर एनर्जीसाठी अनुदानाचा अभाव, ग्रामपंचायत कर, शेती कर्जाच्या व्याजदराच्या तुलनेत अधिक व्याजदराची आकारणी या अडचणींचे निराकरण झाल्यास पशुपालन व्यवसायाकडे लोकांचा कल वाढून पशुजन्य उत्पादनात वाढ होईल. उद्योजकता वाढ, व्यावसायिक नफ्यात वाढ तसेच स्पर्धात्मक वातावरण यामुळे पशुजन्य उत्पादित बाबीस मुल्यवर्धन साखळीची निर्मिती, शेतीप्रमाणे गट पद्धतीने पशुसंवर्धन, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब यासारख्या बाबीमध्ये आपोआप वाढ (resultant increase) होईल, या उदात्त हेतूने हा निर्णय घेण्यात आला आहे.

विभागातील या ऐतिहासिक स्थित्यंतरांचा व निर्णयांचा धांडोळा घेत तो पशुपालकांपर्यंत पोहचविण्यासाठी, तसेच पशुसंवर्धनविषयक विविध योजना, संशोधन, प्रशिक्षण, सेवा व उपक्रमांच्या अंमलबजावणीतून ग्रामीण महाराष्ट्राचे अर्थचक्र आणखी गतिमान करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने 'महापशुधन वार्ता' हे डिजीटल ई-मासिक सुरु करण्याच्या घेतलेल्या निर्णयाचे पशुपालक / शेतकरी बांधवांकडून स्वागत होत आहे. या मासिकाच्या चौथ्या अंकास व ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त सर्व भारतीय नागरिकांना मन:पूर्वक शुभेच्छा!

**(पंकजा गोपीनाथ मुंडे)**

सत्यमेव जयते



**डॉ. रामास्वामी एन.** (भा.प्र.से.)
सचिव (पदुम), मंत्रालय, मुंबई-३२

## !! शुभसंदेश !!

महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यासाठी पशुसंवर्धन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारे व शाश्वत विकासाला बळकटी देणारे एक महत्वाचे क्षेत्र आहे. ग्रामीण अर्थचक्राला गती देणारे व शाश्वत विकासाची प्रेरणा ठरणारे पशुसंवर्धन क्षेत्र राज्याच्या ग्रामीण जीवनाचे आधारस्तंभ आहे. या क्षेत्रामुळे केवळ शेतकऱ्यांच्या उपजीविकेसाठी साधन उपलब्ध होत नाही, तर त्यांना आर्थिक स्थैर्य व सामाजिक प्रतिष्ठाही प्राप्त होते.

पशुधनाच्या व्यवस्थापन व संवर्धनाच्या माध्यमातून महाराष्ट्राने नेहमीच प्रगतीशील धोरणे राबवून ग्रामीण व पर्यायाने शहरी भागाचा विकास साधला आहे. अशा प्रकारे पशुसंवर्धन राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी एक महत्वाचा आधार बनले आहे. त्यातच आता पशुसंवर्धनाच्या व्यवसायाला कृषी समकक्ष दर्जा मिळाला असल्याने आगामी काळात ग्रामीण विकासाच्या कार्यकक्षा आणखी व्यापक होतील, अशी खात्री आहे.

पशुसंवर्धन विभागाच्या आजवरच्या वाटचालीचा आढावा घेताना विभागाने शेतकरी, पशुपालक, महिला बचत गट, दूध उत्पादक संघ, शेतकरी उत्पादक संस्था, पशुपैदासकार संघटना तसेच ग्रामीण, शहरी व निम-शहरी होतकरू व बेरोजगार तरुणांसाठी नवनवीन तंत्रज्ञान, संशोधन व ज्ञानाची कवाडे खुली करून एक प्रेरणादायी कार्य केले आहे. यामध्ये आता आणखी भर पडली आहे ती 'महापशुधन वार्ता' या डिजीटल ई-मासिकाची. दरमहा नियमितपणे प्रकाशित होणाऱ्या या मासिकाचे पशुपालक-शेतकरी बांधवांनी स्वागत केले असून, त्यांच्यासाठी हे मासिक मार्गदर्शक ठरत आहे. 'महापशुधन वार्ता' या डिजीटल ई-मासिकाच्या चौथ्या अंकास व ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त सर्व भारतीय नागरिकांना मन:पूर्वक शुभेच्छा!

**(रामास्वामी एन.)**

सत्यमेव जयते



**डॉ. प्रवीणकुमार देवरे** (भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन , महाराष्ट्र राज्य, पुणे-६७

## !! शुभसंदेश !!

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेत राज्यातील लाखो पशुपालकांना मोठा दिलासा दिला आहे. या निर्णयानुसार, पशुधन आधारित सर्व व्यवसाय आता कृषी व्यवसायाच्या समकक्ष मानले जातील. या निर्णयांमुळे शाश्वत शेतीला चालना मिळेल, ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती होईल आणि शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य वाढेल.

राज्यातील सुमारे ७५ लाख कुटुंबे पशुसंवर्धनाच्या व्यवसायात आहेत, त्यांना या निर्णयाचा थेट लाभ होणार आहे. खऱ्या अर्थानं हा ऐतिहासिक निर्णय आहे. राज्यामधील सर्व पशुपालकांना याचा मोठा फायदा होऊन पशुसंवर्धन विभागाच्या वाढीस याची मोठी मदत होणार आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे महाराष्ट्रातील पशुसंवर्धन क्षेत्रात क्रांती घडेल, असा विश्वास आहे.

साधनांच्या संक्रमणात आधुनिक पशुपालन पद्धतीचा पुरस्कार करण्यास पशुसंवर्धन विभागाने नेहमीच प्राधान्य दिले आहे. त्यामुळेच ही आश्वासक स्थित्यंतरे उद्याच्या प्रगत व अत्याधुनिक पशुसंवर्धनाची नांदी ठरणार आहेत. विभागाच्या या शाश्वत वाटचालीचा आढावा घेण्यासाठी प्रकाशित करण्यात येत असलेले 'महापशुधन वार्ता' हे डिजीटल ई-मासिकही पशुपालकांमध्ये दिवसेंदिवस लोकप्रिय होत आहे. भविष्यात या मासिकाच्या माध्यमातून आपला संवादसेतू अधिक व्यापक व मजबूत होईल याची खात्री आहे. चौथ्या अंकास व ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त सर्व भारतीय नागरिकांना मन:पूर्वक शुभेच्छा!

(डॉ. प्रविणकुमार देवरे)

डिजीटल ई-मासिक

महापशुधन वार्ता

वर्ष १ ले, अंक ४ था

माहे ऑगस्ट-२०२५

पशुधन हिताय: बहुजन सुखाय:

## या अंकात. . .


- पशुसंवर्धन व्यवसायास कृषि समकक्ष दर्जा देणारे महाराष्ट्र पहिले राज्य
- राज्यात ३५७ पशुवैद्यकीय दवाखान्यांना मिळणार नवीन इमारती
- मा. सचिव महोदयांची धनगर वस्तीला भेट, पशुपालकांशी साधला संवाद
- महानंद ब्रँडचे पुनरुज्जीवन व सहकार क्षेत्रातील सुधारणांसाठी मा. सचिव (पदुम) यांनी घेतली एनडीडीबीचे अध्यक्ष मा. डॉ. मीनेश सी. शाह यांची भेट
- गायीच्या पोटातून काढले ४० किलो प्लास्टिक
- सांगलीत लाखभर लिटरने वाढले दूध संकलन
- विदर्भ मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पाच्या (VMDDP) जिल्हा प्रकल्प अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण
- लाळखुरकत निदेशालय, भुवनेश्वरचे प्रमुख डॉ. आर. पी. सिंह यांची आयव्हीबीपी संस्थेस भेट
- प्रगत तंत्रज्ञानाद्वारे पशु प्रजाती सुधारणेवर लक्ष केंद्रित करण्यासाठी कार्यशाळा आयोजन एक महत्त्वाचे पाऊल ठरेल- केंद्रीय (FAHD&PR) मंत्री मा. राजीव रंजन सिंह यांचे प्रतिपादन
- गोसेवा आयोगाचे नोंदणी प्रमाणपत्र वाटप
- गोसेवा आयोगाच्या वतीने आयोजन; गोप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थिती
- कार्यशाळा: कार्यरत अश्ववर्गीय प्राण्यांमधील आरोग्य समस्या व त्यांचे व्यवस्थापन: व्यावहारिक मार्गदर्शन
- सालमोनेल्ला कलर अँटीजेन आता नवीन पॅकिंगमध्ये उपलब्ध
- रेबीजमुक्त लातूरसाठी एक पाऊल
- माध्यमांनी घेतलेली दखल
- पशुसंवर्धनाला कृषीचा दर्जा...ग्रामीण विकासाला मिळणार नवी ऊर्जा
- स्मार्ट प्रकल्प : एक दृष्टीक्षेप
- लम्पी चर्मरोगाचे निर्मुलन, सामुहिक प्रयत्नांनी मिळवूया नियंत्रण
- उत्तम प्रजनन... ५५ टक्के जुळी... पश्चिम घाटासाठी वरदान झालवाडी शेळी!
- धोक्यांची बेरीज...जीवघेणा रेबीज
- चारा लागवडीतून दररोज ४ ते ५ हजार रुपयांची कमाई
- गुळ पेढा निर्मिती तंत्रज्ञान व पद्धती
- शिवारगप्पा पशुधनाच्या: कहाणी लंपी चर्मरोगाची (भाग १)


या अंकातील लेखांमध्ये व्यक्त करण्यात आलेल्या मतांशी संपादक व पशुसंवर्धन विभाग सहमत असेलच, असे नाही ( पुणे न्यायकक्षेत ).

प्रकाशक: पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र राज्य

# पशुसंवर्धन व्यवसायास कृषीसमकक्ष दर्जा देणारे महाराष्ट्र पहिले राज्य



पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७

महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाने पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेत राज्यातील लाखो पशुपालकांना मोठा दिलासा दिला आहे. या धोरणात्मक सुधारणेमुळे दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन व वराहपालन व्यवसाय करणाऱ्या पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार असून, त्यांना नव्या सवलतींचा लाभ होणार आहे. या निर्णयानुसार, पशुधन आधारित सर्व व्यवसाय आता कृषी व्यवसायाच्या समकक्ष मानले जातील, अशी घोषणा पशुसंवर्धनमंत्री मा. श्रीमती पंकजा मुंडे यांनी शुक्रवारी (दि. ११जुलै २०२५) विधीमंडळात केली. या निर्णयाचा राज्यातील ७५ लाख पशुपालकांना लाभ होणार आहे.

### निर्णयाचा तपशील

१. पशुसंवर्धन व्यवसायाला कृषि समकक्ष दर्जा देण्यास मान्यता.

२. २५,००० मांसल कुक्कुट पक्षी पर्यंतच्या / ५०,००० अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी क्षमते पर्यंतच्या तसेच ४५,००० हॅचरी युनिट पर्यंत क्षमता असलेल्या कुक्कुटपालन व्यवसायास, १०० दुधाळ जनावरांच्या संगोपनापर्यंत, ५०० मेंढी / शेळीपालन व २०० वराह या पशुसंवर्धनविषयक व्यवसायासाठी वीज दर आकारणी "कृषी इतर" या वर्गवारीनुसार न करता कृषि वर्गवारीप्रमाणे करण्यास मान्यता.

३. उपरोक्तप्रमाणे पशुपालन व्यवसायास स्वतंत्र व्यवसाय न समजता शेती व्यवसाय समजून ग्रामपंचायत कर दरात एकसमानता आणण्याकरिता कृषि व्यवसायास ज्या दराने कर आकारणी केली जाते, त्याच दराने कर आकारणी करण्यास मान्यता देण्यात आली.

४. कृषिप्रमाणे पशुपालन व्यवसायास कर्जावरील व्याज दरात सवलत देण्यास मान्यता देण्यात आली.

५. कृषीप्रमाणे कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सोलर पंप व इतर सोलार संच उभारण्यास सवलत देण्यास मान्यता.

६. सदर धोरणाच्या अंमलबजावणीसाठी अतिरीक्त नियतव्यय उपलब्ध करुन देण्यास मान्यता.

महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन डॉलर पर्यंत पोहोचविण्यासाठी पथदर्शी आराखडा अहवाल शासनास सादर केला आहे. सदर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आर्थिक सल्लागार परिषदेने जे घटक उत्पन्न वाढीस चालना देऊ शकतील, असे ८ घटक सुनिश्चित केले आहेत. यामध्ये "कृषि व संलग्न" या घटकाचा समावेश आहे. सद्यस्थितीत राज्याच्या सकल उत्पन्नात कृषि क्षेत्राचा वाटा १२ टक्के इतका असून, कृषि क्षेत्राच्या एकूण उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा वाटा २४ टक्के इतका आहे. निती आयोगाने सन २०२१ च्या अहवालात पशुसंवर्धन व्यवसायापासून देशाच्या / राज्याच्या सकल उत्पादनात पशुसंवर्धन व्यवसायाचा सहभाग वाढविण्यासाठी उपाययोजना करण्याची शिफारस केली होती.

**निती आयोगाचे निरीक्षण:** निती आयोगाच्या सन २०२१ च्या अहवालानुसार, सन २०११-१२ ते २०१७-१८ या कालावधीत कृषी क्षेत्रातील पिकांचा जीडीपीमधील वाटा १२.१ टक्क्यांपासून ८.७ टक्क्यांपर्यंत कमी होत गेला आहे. याउलट पशुसंवर्धनाचा वाटा वाढत जाऊन तो ४ टक्क्यांवर स्थिरावला आहे. सन २०३० पर्यंत दूध, अंडी, मांस यांची एकूण मागणी सुमारे १७ कोटी इतकी राहणार असून, ती तृणधान्यांपेक्षा अधिक असेल. पशुसंवर्धन क्षेत्रामध्ये नियोजनपुर्वक व शास्त्रीय पध्दतीचे व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष होत असल्याकडेही निती आयोगाने लक्ष वेधत, त्यावर उपाययोजना करुन शेतकऱ्यांची / पशुपालकांची आर्थिक जोखीम कमी करण्याची शिफारस केली होती.

पशुपालकांना भेडसावणाऱ्या कृषि वीज दराच्या तुलनेत जास्त वीज दर, सोलर एनर्जीसाठी अनुदानाचा अभाव, ग्रामपंचायत कर, शेतीकर्जाच्या व्याजदराच्या तुलनेत अधिक व्याजदराच्या आकारणीचे निराकरण झाल्यास पशुपालन व्यवसायाकडे लोकांचा...

> "पशुसंवर्धनाच्या व्यवसायास प्रोत्साहन देताना कृषि व्यवसायाप्रमाणे सवलती देणे आवश्यक असल्याने राज्य सरकारने पशुपालन व्यवसायास कृषि समकक्ष दर्जा दिला आहे. विभागाच्या वाटचालीतील हा एक ऐतिहासिक निर्णय असून, या निर्णयामुळे भविष्यात पशुसंवर्धनाच्या माध्यमातून महाराष्ट्राचे ग्रामीण अर्थचक्र गतिमान होईल, अशी मला खात्री आहे."



कल वाढून पशुजन्य उत्पादनात वाढ होईल. उद्योजकता वाढ, व्यावसायिक नफ्यात वाढ तसेच स्पर्धात्मक वातावरण यामुळे पशुजन्य उत्पादनांस मुल्यवर्धन साखळीची निर्मिती, शेतीप्रमाणे गट पद्धतीने पशुसंवर्धन, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब यासारख्या बाबीमध्ये आपोआप वाढ (resultant increase) होईल.

या निर्णयामुळे शाश्वत शेतीला चालना मिळेल, ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती होईल व शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य वाढेल. राज्यातील सुमारे ७५ लाख कुटुंबे पशुसंवर्धनाच्या व्यवसायात आहेत, त्यांना याचा थेट लाभ होणार आहे. खऱ्या अर्थानं हा ऐतिहासिक निर्णय आहे. राज्यामधील सर्व पशुपालकांना याचा मोठा फायदा होऊन पशुसंवर्धन विभागाच्या वाढीस याची मोठी मदत होणार आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे महाराष्ट्रातील पशुसंवर्धन क्षेत्रात क्रांती घडेल, असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त व नियोजन) श्री. अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.




# राज्यात ३५७ पशुवैद्यकीय दवाखान्यांना मिळणार नवीन इमारती

**पशुसंवर्धन आयुक्तालय, पुणे-४११०६७**

राज्यात ३५७ ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत. जिल्हा वार्षिक योजनेतून इमारत बांधकामासह दवाखान्याची दुरूस्ती, स्वच्छतागृह व उपकरण खरेदी यासाठी ४५८ कोटी ४१ लाख ३४ हजार रूपयांची तरतूद करण्यात आली आहे, अशी माहिती पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री मा. ना. श्रीमती पंकजा मुंडे यांनी दिली.

पशुसंवर्धन विभागाचा कार्यभार स्विकारल्यापासून श्रीमती पंकजा मुंडे यांनी एका मागोमाग एक ऐतिहासिक निर्णयांसह लोकाभिमुख कामांसंदर्भात निर्णय घेण्यास प्राधान्य दिले आहे. पशुसंवर्धनला कृषी व्यवसायाचा दर्जा देणारे देशातील पहिले राज्य करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्यातील पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती देण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे राज्याच्या सात महसूली विभागातील ३४ जिल्ह्यात एकूण ३५७ ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत. नवीन इमारत बांधण्याकरिता २८७ कोटी ७६ लाख ४४ हजार तर दुरुस्तीसाठी १२१ कोटी ११ लाख ८२ हजार, स्वच्छतागृह यासाठी २५ कोटी १७ लाख २० हजार निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच विविध उपकरणे खरेदीसाठी २४ कोटी ३५ लाख ८८ हजार असा एकूण ४५८ कोटी ४१ लाख ३४ हजार रूपये निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ही सर्व कामे प्रस्तावित करण्यात येणार आहेत.

## नवीन इमारतींची विभागनिहाय संख्या

| अ.क्र. | विभागाचे नाव | जिल्ह्यांची नावे | इमारतींची संख्या |
|---|---|---|---|
| १ | मुंबई विभाग | ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | १३ |
| २ | पुणे विभाग | पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर | १२५ |
| ३ | नाशिक विभाग | नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर | ५५ |
| ४ | छत्रपती संभाजीनगर विभाग | छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड | ५१ |
| ५ | लातूर विभाग | लातूर, नांदेड, धाराशिव, हिंगोली | ३९ |
| ६ | अमरावती विभाग | अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ | ३८ |
| ७ | नागपुर विभाग | नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली | ३६ |
| | | एकूण | ३५७ |

# धनगर बांधवांच्या वस्तीला मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी यांची भेट



धनगर समाजात शिक्षणाचे प्रमाण इतरांच्या तुलनेत अल्प. वस्तीला गावकुसात असला, तरी मुळात तो भटका समाज. वर्षातील सात ते आठ महिने मेंढरे चारण्यासाठी, गाव सोडून हा समाज दूर परमुलुखात जात असतो. खंडी-दीड खंडी मेंढरे राखण्यासाठी तीनचार माणसांची गरज असते. दिवसभराचे मेंढरांपाठीमागचे भटकणे, दिवसातून एखाद्याने गावातून बाजारहाट, दळण आणणे, अन्यथा एका ठिकाणी कसला तो विसावा नाही. रात्रीचे मुक्काम माळरानावर. वर्तमानपत्र अन् लोक यांच्यापासून दूर, निर्मनुष्य रानामध्ये. त्यामुळे विकास अन् बदल यांच्या अनुषंगाने कोणाशी कसलाही संवाद नाही. कुठलाही आजार उद्भवला, जखम झाली अथवा अपघात घडला तर जवळची हळद सोडल्यास तातडीचा वैद्यकीय इलाज नाही. अशा एक ना अनेक आव्हानांचा सामना करणाऱ्या धनगर बांधवांची महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) यांनी थेट वस्तीवर जाऊन भेट घेत संवाद साधला.

अमरावती जिल्ह्यातील हरिभाऊ शिंदे यांच्या भानखेड रस्त्यावरील वाड्यावर महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्य व्यवसाय विभागाचे सचिव मा. डॉ. रामास्वामी एन. (भा. प्र. से.) यांनी भेट दिली. यावेळी मेंढपाळ धनगर विकास मंचचे संस्थापक अध्यक्ष संतोष महात्मे, पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त तथा अहिल्यादेवी शेळी व मेंढी विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. शितलकुमार मुकणे, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय डॉ. संजय कावरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सोळंके यांचे सह प्रविण भुजाडे, पल्लवी लांडे, मेंढपाळ विकास मंचचे जिल्हाध्यक्ष जानराव कोकरे आदी उपस्थित होते.

पारंपारिक पद्धतीने भटकंती करुन मेंढीपालन करताना येणाऱ्या अडचणींबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. मेंढ्यांच्या आरोग्य सुविधेबाबत मा. सचिव महोदयांनी यावेळी आपले अधिनस्त अधिकाऱ्यांना निर्देश दिले. मेंढी व शेळी पशुधनास आवश्यक संतुलित आहार देण्याबाबत चर्चा करण्यात आली. प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणाऱ्या अर्धबंदिस्त मेंढीपालन प्रकल्पाची चर्चा करण्यात येऊन जागेची पाहणी करण्यात आली. यावेळी हरीभाऊ शिंदे, गुणवंत कोकरे, देवराव शिंदे, मंगेश शिंदे, गोमा पोकळे, मोहन शिंदे, झामा कारंडे, अर्जुन कोकरे, भिमराव शिंदे, दादाराव शिंदे, शरद शिंदे, सोमा शिंदे, अशोक कोकरे, मोहन कोकरे, देवराव कोकरे, तुकाराम यमगर, संजय सुळ, लक्ष्मण आयनर, रतन यमगर, संजय कोकरे आदी उपस्थित होते.

"धनगर समाज आदिम काळापासून पशुपालन क्षेत्रात कार्यरत आहे. मेंढी व शेळीसह गाय आणि म्हैस या दुभत्या पशुधनाचे संगोपन व संवर्धन हा समाज करीत आहे. भटकंतीमुळे या समाजाचा शैक्षणिक विकास अपेक्षेनुरुप झालेला नाही. मात्र, पारंपारिक पशुपालनाच्या माध्यमातून या समाजाने आपली सभ्यता व संस्कृती टिकवून ठेवली आहे. पशुपालन क्षेत्रातील या समाजाचे योगदान लक्षात घेता भविष्यात या समाजाच्या उन्नतीसाठी आणखी चांगल्या योजना कार्यान्वित करण्यासाठी शासन प्रयत्नशील राहिल."

**-डॉ. रामास्वामी एन.** (भा. प्र. से.), सचिव (पदुम)



अमरावती जिल्ह्यातील हरिभाऊ शिंदे यांच्या भानखेड रस्त्यावरील धनगर वाड्यावर भेट दिल्यानंतर प्रक्षेत्राची पाहणी करताना मा. सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन.. यावेळी मा. सचिव महोदयांचे पारंपारिक पद्धतीने औक्षण करुन धनगरी बांधवांकडून स्वागत करण्यात आले.







# महानंद ब्रँडचे पुनरुज्जीवन व सहकार क्षेत्रातील सुधारणांसाठी मा. सचिव (पदुम) यांनी घेतली एनडीडीबीचे अध्यक्ष मा. डॉ. मीनेश सी. शाह यांची भेट

महानंद ब्रँडचे पुनरुज्जीवन आणि राज्यातील दुग्ध सहकारी संस्थांमधील धोरणात्मक सुधारणांबद्दल चर्चा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यव्यवसाय विभागाचे (एडीएफ) सचिव मा. डॉ. एन. रामास्वामी (भा.प्र.से.) यांनी एनडीडीबी (नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्ड) चे अध्यक्ष मा. डॉ. मीनेश सी. शाह यांची भेट घेतली. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतलकुमार मुकणे; एनडीडीबीचे प्रादेशिक प्रमुख (पश्चिम) श्री. व्ही. श्रीनिवास, विदर्भ मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पाचे विशेष कार्य अधिकारी श्री. एस. गोराणी व महानंद डेअरीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. अनिल हातेकर आदी उपस्थित होते.

चर्चेच्या प्रमुख टप्प्यांमध्ये सहकारी दुग्ध विकास क्षेत्रातील कामकाज मजबूत करणे, दुग्धशाळेच्या पायाभूत सुविधांचे अपग्रेडेशन आणि पशुउत्पादकता वाढविण्यासाठी लिंग-वर्गीकृत वीर्यमात्रांची उपलब्धता वाढवणे यांचा समावेश होता. डॉ. रामास्वामी एन. यांनी विदर्भ मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातंर्गत विदर्भ-मराठवाडा भागात एनडीडीबीमार्फत करण्यात येणाऱ्या सहकार्याबद्दल आणि या भागात दुग्धव्यवसायाच्या कक्षा विकसित करण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात येणाऱ्या प्रयत्नांबाबत डॉ. मीनेश सी. शाह यांच्याशी चर्चा केली.

डॉ. शाह यांनी बायोगॅससारख्या संलग्न क्षेत्रांद्वारे शेतकऱ्यांसाठी पर्यायी उत्पन्नाचे स्रोत शोधण्याचा सल्ला देत आरे येथे १०० मेट्रिक टन क्षमतेचा सीबीजी प्लांट उभारण्याचा प्रस्ताव मांडला. त्यांनी नॅशनल कोऑपरेटिव्ह ऑरगॅनिक्स लिमिटेडच्या माध्यमातून सेंद्रिय उत्पादन विकासाच्या संधींवरही प्रकाश टाकला. बैठकीत महाराष्ट्रातील दुग्ध क्षेत्र मजबूत करणे आणि शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारणे यावर एक समान भर देण्यात आला.

या भेटीदरम्यान, शिष्टमंडळाने एनडीडीबी अंतर्गत उभारण्यात आलेल्या विविध प्रकल्पांना भेटी दिल्या. यादरम्यान शिष्टमंडळाने भारतीय दुग्ध क्षेत्राच्या इतिहास आणि आधुनिक संक्रमणातील वाटचालीचे सादरीकरण पाहिले.

शिष्टमंडळाने जीनोमिक्स लॅब, ओपीयू-आयव्हीएफ लॅब, चारा प्रात्यक्षिक युनिट, एनडीडीबी कॅल्फ लिमिटेड, आयडीएमसी लिमिटेडला भेट दिली आणि मुजकुवा गावातील खत व्यवस्थापन केंद्र, सौर पंप सिंचन सहकारी संस्था आणि दुग्ध सहकारी संस्थेतील शेतकरी लाभार्थ्यांशी संवाद साधला. याशिवाय, त्यांनी अमूल डेअरी, त्रिभुवनदास फूड कॉम्प्लेक्स (चॉकलेट प्लांट), मोगर येथील गोवंश प्रजनन केंद्र, सारसा येथील वासरांचे संगोपन केंद्र आणि ओडे येथील अमूल डेअरीचे वीर्य संकलन केंद्र आदी प्रकल्पांनाही भेट दिली.




'एनडीडीबी' भेटीतील काही क्षणचित्रे













# महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण मार्फत राज्यातील पहिल्या सहा रेत केंद्रांना नोंदणी प्रमाणपत्र प्रदान

राज्यामधील गोजातीय प्रजनन क्रियांचे विनियमन करण्यासाठी कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे. त्यानुसार राज्यामध्ये रेत उत्पादनासाठी प्रजननक्षम वळूंचा वापर, गोजातीय रेत संस्करण, साठवण, विक्री व वितरण, गोजातीमध्ये सहयोगी जनन तंत्रज्ञानसह कृत्रिम रेतन करणे, यासारख्या गोजातीय प्रजनन क्रियांचे विनियमन करून त्याद्वारे गोजातीयमध्ये सुधारणा करण्यासाठी "**महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३**" (Bovine Breeding Act २०२३) हा कायदा राज्यात लागू करण्यात आला आहे. सदर कायदयाची अंबलबजावणी ५ डिसेंबर २०२४ पासून करण्यात येत असून, या अधिनियमातंर्गत राज्यातील पहिल्या सहा रेत केंद्रांना सदर नोंदणी प्रमाणपत्र मा. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे (भा.प्र.से.) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. यावेळी उपआयुक्त डॉ. शिवाजी पवार, उपआयुक्त पशुसंवर्धन (जिल्हा प्राणी कल्याण मंडळ) व डॉ. प्रशांत भड उपआयुक्त पशुसंवर्धन तथा सदस्य सचिव महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण उपस्थित होते.

महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) अधिनियम, २०२३ च्या कलम ४ च्या पोट-कलम (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण याद्वारे सदर प्रमाणपत्र पुढील पाच वर्षांच्या वैधता कालावधीसाठी प्रदान करण्यात आले आहे. ही नोंदणी उपरोक्त अधिनियमास व त्याखाली केलेल्या नियमांना अधीन राहून करण्यात आली आहे. त्याचे कोणतेही उल्लंघन केल्यास खटला दाखल करण्याबरोबरच उक्त पाच वर्षांचा कालावधी संपण्यापुर्वी हे नोंदणी प्रमाणपत्र निलंबित किंवा रद्द करण्यात येऊ शकते.

अधिनियम अधिसूचित केल्यापासून सहा महिन्यात प्राधिकरणकडे नोंदणी करणे बंधनकारक आहे. अधिनियमा अंतर्गत विहित केलेल्या सेवाकरीता नोंदणी शुल्कासह अर्ज प्राधिकरणाकडे करू शकतात, नोंदणी करिता अर्ज प्राप्त झाल्यानंतर कायद्यांतर्गत नमूद विहित मानकांचे पालन करण्याबत प्राधिकरणाद्वारा नियुक्त समिती केंद्रांची तपासणी करते. प्राधिकरणाची खात्री झाल्यानंतर नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येते.

# महाराष्ट्र गोजातीय प्रजनन अधिनियम प्राधिकरण मार्फत रेत संकलन केंद्रांची तपासणी









महाराष्ट्र गोजातीय प्रजनन अधिनियम प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे- ६७ या प्राधिकरणाने गोजातीय प्रजननाच्या विविध संस्था तसेच संबंधित व्यक्ती यांची नोंदणी करणे बंधनकारक आहे. त्यानुषंगाने आयुक्त पशुसंवर्धन मा. डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी मान्यता दिलेल्या तपासणी समितीने दि. ३० जुलै ते ०१ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राहुरी येथील सिमेन स्टेशन (एनडीडीबी डेअरी सर्विसेसची शाखा) जि. अहिल्यानगर, शासकीय गोठीत रेतमात्रा निर्मिती केंद्र, छत्रपती संभाजीनगर, पुणे व नागपुर तसेच बायफ यांचे वीर्यमात्रा निर्मिती केंद्र, उरळी कांचन व चितळे डेअरी यांची एबीएस Genus वीर्यमात्रा निर्मिती संस्था, आदी ठिकाणी भेट देऊन तेथील तांत्रिक कामकाज व वीर्यमात्रा उत्पादन यांची तपासणी केली.

समितीने सदर संस्थांतर्गत केंद्रीय नियंत्रण समितीने दिलेल्या एसओपी व एनएसपी प्रमाणे तसेच राज्यात सन २०१० मध्ये लागु केलेल्या महाराष्ट्र स्टेट बोव्हाईन ब्रिडींग पॉलिसी २०१० प्रमाणे कामकाज केले जाते की नाही, याबाबत तपासणी केली. तसेच तांत्रिक परीक्षणही केले.

महाराष्ट्र गोजातीय प्रजनन अधिनियम प्राधिकरण, यांचेकडे नोंदणी करताना रेतमात्रांच्या गुणवत्तेबरोबरच प्रत्येक वळुच्या उच्च वंशावळीच्या प्रजनन क्षमतेचाही विचार केला जाणार आहे. तसेच उपरोक्त सहाही संस्थांची तपासणी करुन या संस्थांनी निर्माण केलेल्या रेतमात्रांची विक्री करणाऱ्या सीमेन बँक व त्याचा वापर करणारे एआय वर्कर व त्यांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचीसुद्धा नोंदणी करण्यात येणार आहे.

सदर संस्थांची काटेकोर तपासणी डॉ. शशिकांत सांभारे (सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन तथा अध्यक्ष, तपासणी समिती), डॉ. धनाजी पाटील (सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धना तथा सदस्य सचिव, तपासणी समिती, पशुसंवर्धन आयुक्तालय), डॉ. विष्णु जवणे व डॉ. रोहिणी अरबाळ (पविअ, तथा सदस्य, तपासणी समिती) आदींसह संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय आदींनी केली.

# गायीच्या पोटातून काढले ४० किलो प्लास्टिक

## 'मोती'ला मिळाले जीवनदान!



**यवतमाळ** (डॉ. गोपाल चव्हाण यांचेकडून) : वर्धा जिल्ह्यातून आणलेल्या मोती नावाच्या गायीच्या पोटातून तब्बल ४० किलो प्लास्टिक आणि इतर धातूंच्या वस्तू यशस्वीरित्या काढून तिला जीवनदान देण्यात आले आहे. एका महिन्यापूर्वी विकत घेतलेल्या या गायीने एका वासराला जन्म दिल्यानंतर चारा खाणे कमी केले होते. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. गोपाल चव्हाण यांना तपासणीदरम्यान गायीच्या पोटात प्लास्टिक असल्याचा संशय आला, जो मेटल डिटेक्टरने निश्चित करण्यात आला.

गायीच्या पोटात प्लास्टिक असल्याची खात्री झाल्यानंतर सकाळी ११ वाजता शस्त्रक्रियेला सुरुवात झाली. या ऑपरेशनमध्ये गायीच्या पोटातून ९ खिळे, ३ पैशांचे नाणे, बांगड्यांचे तुकडे, ब्लेड, रिंग, काचेचे तुकडे आणि ४० किलो प्लास्टिक काढण्यात आले. सध्या गाय सुखरूप असून, तिच्या प्रकृतीत सुधारणा होत आहे. या घटनेने डॉ. कोठारी यांच्या 'गंगा' नावाच्या गायीच्या आठवणी ताज्या झाल्या, जिच्या पोटातून वर्षभरापूर्वी ३५ किलो प्लास्टिक काढण्यात आले होते.

डॉ. गोपाल चव्हाण यांनी सांगितले की, जनावरांमध्ये फॉस्फरसची कमतरता असल्याने त्यांना प्लास्टिक किंवा इतर वस्तू खाण्याची सवय लागते. हे टाळण्यासाठी पशुवैद्यकाच्या सल्ल्याने जनावरांवर उपचार करावेत. पशुधनाच्या आहारामध्ये मिनरल मिक्श्चरचा समावेश करावा. पशुधनास उघड्यावर चरावयास सोडू नये. मुक्त संचार गोठा पद्धतीचा अवलंब करुन गोठ्यात योग्य ठिकाणी क्षार मिश्रणाच्या विटा लटकवाव्यात, म्हणजे पशुधनास पाहिजे तेव्हा आपली क्षारांची गरज भरुन काढणे शक्य होईल.

# सांगलीत लाखभर लिटरने वाढले दूध संकलन

## जिल्ह्यातील तुलनात्मक दूध संकलन

| संघ | मे २०२५ | जून २०२५ |
|---|---|---|
| सहकार | २४७१८८ | २४६६६६ |
| मल्टिस्टेट | १९४४२४ | १८०९८९ |
| खासगी | १००७०४७ | ११३५६१६ |
| एकूण | १४४८६५९ | १५६३२७१ |



**सांगली:** जिल्ह्यात मे महिन्यापासून चांगला पाऊस सुरू झाल्यामुळे ओला चारा मुबलक उपलब्ध झाला आहे. जिल्ह्यात जून महिन्यात १५ लाख ६३ हजार २७१ लिटर दररोज दूध संकलन झाले आहे. मे महिन्याच्या तुलनेत जून महिन्यात १ लाख १४ हजार ६१२ लिटरने दूध संकलन वाढले असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यात सहकार, मल्टिस्टेट आणि खासगी असे संघ आहेत. या संघांच्या माध्यमातून जिल्ह्यात दैनंदिन १५ लाख लिटर दूध संकलित होते. यापैकी ५० टक्के पिशवीबंद दुधाची विक्री होते.

जिल्ह्यात मार्च महिन्यापासून वाढती उष्णता, काही अंशी चाराटंचाई व पाणीटंचाईचा फटका दुधाच्या उत्पादनावर झाला होता. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांत मे महिन्यापासून अपेक्षित पाऊस झाला. त्यामुळे ओला चारा मुबलक उपलब्ध झाला. तसेच पशुधनाला वेळेवर लसीकरणही झाले. यामुळे दुधाच्या उत्पादनात वाढ झाली आहे. जून महिन्यात १५ लाख ६३ हजार २१७ लिटर इतके दुधाचे संकलन झाले. जिल्ह्याच्या बाहेरून १५ हजार, तर राज्याबाहेरून ७५ हजार २३६ लिटर आवक होऊन एकूण १६ हजार ५३ हजार ५०७ लिटर दुधाचे संकलन झाले. जून महिन्यात खासगी संघात ११ लाख ३५ हजार ६१६ इतके लिटर संकलन झाले. खासगी संघाकडे मे महिन्याच्या तुलनेत जून महिन्यात १ लाख २८ हजार ५६९ लिटरने संकलनात वाढ झाल्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. अजयनाथ थोरे यांनी सांगितले.

# विदर्भ मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण




विदर्भ मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पाच्या (VMDDP) जिल्हा प्रकल्प अधिकाऱ्यांसाठी नागपूर येथील प्रादेशिक सहआयुक्त कार्यालयात VMDDP चे प्रकल्प संचालक डॉ. संजय गोराणी यांच्या उपस्थितीत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी उपस्थित अधिकारी. विदर्भ आणि मराठवाड्यातील १९ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणारा VMDDP हा शाश्वत आणि हवामान-प्रतिरोधक दुग्धव्यवसाय पद्धतींद्वारे शेतकऱ्यांना सक्षम बनवण्याचा एक परिवर्तनकारी उपक्रम आहे.

**विदर्भ व मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत खालीलप्रमाणे विविध ९ घटक यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.**

१. उच्च दुध उत्पादन क्षमता असलेल्या दुधाळ गायी म्हशींचे शेतकरी, पशुपालक यांना वाटप यांना वाटप

२. उच्च दुध उत्पादन क्षमता असलेल्या भ्रुणांचे प्रत्यारोपण केलेल्या कालवडींचे शेतकऱ्यांना वाटप

३. पशु प्रजनन पुरक खाद्य (Fertility Feed) चा पुरवठा (३०,००० मे. टन)

४. दुधातील फॅट व एसएनएफ वर्धक (Enhancing) खाद्य पुरकाचां पुरवठा

५. बहुवार्षिक चारा पिके घेण्यासाठी अनुदान

६. शेतकरी, पशुपालक यांना विद्युत चलित कडबाकुट्टी सयंत्राचे वाटप

७. मुरघास वाटप

८. गायी-म्हशींमधील वंध्यत्व निवारण कार्यक्रम

९. आधुनिक पध्दतीने दुग्ध व्यवसाय करण्यासाठी शेतक-यांना प्रशिक्षण

शेतकऱ्यांच्या दारात गायी-म्हशींमध्ये पारंपारीक पध्दतीच्या तसेच, लिंग वर्गीकृत केलेल्या गोठीत रेतमात्राचां वापर करून कृत्रिम रेतनाची सुविधा तसेच भ्रूण प्रत्यारोपणांव्दारे दुधाळ जनावरांची संख्या वाढविणे, शेतकरी, पशुपालक यांना संतुलीत आहार सल्ला देणे, वैरण विकास कार्यक्रम आणि दर्जेदार चारा पुरवठा करून पशुंच्या आहार पद्धतीत सुधारणा करणे, गावपातळीवर पशुआरोग्य सेवा पुरविणे, उच्च दूध उत्सपादन क्षमता असलेल्या गायी-म्हशींचे वाटप, शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून त्यांची उन्नती करणे व ग्रामीण भागात रोजगार निर्मीती वाढविणे आदी या प्रकल्पाची उद्दिष्टे आहेत.




**पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७**

दि. १७ जुलै २०२५ रोजी लाळखुरकत निदेशालय, भुवनेश्वरचे प्रमुख डॉ. आर. पी. सिंह यांनी लाळखुरकतमुक्त राज्य निर्मितीकरीता मार्गदर्शन व लसीकरण, सिरो सर्वेलन्स, सिरो मॉनिटरिंग याविषयी चर्चा करणेकरिता भेट दिली. आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी राज्यातील लाळखुरकत नियंत्रण व रोगमुक्त क्षेत्र निर्माण करणेकरिता राज्यात होत असलेल्या कामकाजाबद्दल व फेरी-७ च्या पुर्वतयारीबाबत माहिती दिली. सुमारे अडीच तास झालेल्या चर्चेत डॉ. आर. पी. सिंह यांनी राज्यातील कामकाजाबद्दल व सिरो मॉनिटरिंग चाचण्यांबद्दल उत्कृष्टरित्या कामकाज चालले असल्याचे नमूद करत, गत फेऱ्यांमधील निष्कर्ष उत्साहवर्धक असल्याचे सांगितले. राज्यात शीतसाखळीचे कार्यान्वयन उत्कृष्ट असल्याने, तसेच क्षेत्रीय पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना सिरिंज-नीडल व आवश्यक साधनांचा वेळेवर व पुरेसा पुरवठा होत आहे, याशिवाय मोठ्या प्रमाणावर प्रभावी जनजागृती होत असल्यामुळे हा सकारात्मक परिणाम दिसत असलेचे नमूद केले. डॉ. आर. पी. सिंह यांनी यानंतर BSL-३ प्रयोगशाळेसही भेट दिली.

## लाळखुरकत निदेशालय, भुवनेश्वर संस्थेच्या अधिकाऱ्यांची आयव्हीबीपी संस्थेस भेट




दि.१९ जुलै, २०२५ रोजी राष्ट्रीय अश्व संशोधन केंद्र हिसार, हरियाणा या संस्थेचे अश्व आरोग्य विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. नितीन विरमनी यांनी भारतरत्न अटल बिहारी राज्यस्तरिय पशुरोग अन्वेषण प्रयोगशाळा, पुणे या संस्थेस भेट दिली. सदर भेटीचा उद्देश भारतरत्न अटल बिहारी राज्यस्तरिय पशुरोग अन्वेषण प्रयोगशाळा, पुणे या संस्थेत इक्वाईन इंफ्लूएंझा या रोगाच्या क्यु-पीसीआर आणि हिम ॲग्ल्युटीनेशन इनहिबीशन या चाचण्यांचा आंतर प्रयोगशाळा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी पायाभुत सुविधा व तज्ञ मनुष्यबळ यांची पाहणी करणे हा होता.




# प्रगत तंत्रज्ञानाद्वारे पशु प्रजाती सुधारणेवर लक्ष केंद्रित करण्यासाठी कार्यशाळा आयोजन एक महत्त्वाचे पाऊल ठरेल

# केंद्रीय (FAHD&PR) मंत्री मा. राजीव रंजन सिंह यांचे प्रतिपादन

प्रगत तंत्रज्ञानाद्वारे पशु प्रजाती सुधारणेवर लक्ष केंद्रित करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करणे हे भारताच्या पशुपालन क्षेत्राच्या प्रगती व विकासासाठी महत्वपूर्ण उपक्रम आहे. तसेच, ही कार्यशाळा भारतातील पशुधनाच्या विविध प्रजातीच्या विकासासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांना जागतिक मानकांशी जुळवून घेण्याच्या दिशेने व देशभरातील पशुपालकांसाठी शाश्वतता, उत्पादकता आणि वाढीव उत्पन्न सुनिश्चित करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, असे प्रतिपादन केंद्रीय मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय आणि पंचायत राजमंत्री (FAHD&PR), मा. श्री. राजीव रंजन सिंह उर्फ ललन सिंह यांनी केले.

दि. १२ जुलै २०२५ रोजी इंदिरा गांधी कन्व्हेन्शन सेंटर, लखनऊ, उत्तर प्रदेश (उत्तर प्रदेश) येथे आयोजित "भारतातील पशुधन प्रजाती विकासावरील कार्यशाळा" या विषयावरील मा. श्री. राजीव रंजन यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. या कार्यशाळेस उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री मा. श्री. योगी आदित्यनाथ कार्यशाळेचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. उत्तर प्रदेशचे पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री श्री. धर्मपाल सिंह, अरुणाचल प्रदेशचे पशुसंवर्धन मंत्री श्री गॅब्रिएल डी. वांग्सू यांनीही या कार्यक्रमाला उपस्थिती लावली. या कार्यशाळेत केंद्र आणि राज्य सरकारे, संशोधन संस्था, खाजगी संस्था, धोरणकर्ते आणि देशभरातील प्रगतीशील शेतकरी यांच्यातील तज्ञांनी पशुधन क्षेत्रात स्थानिक जाती विकास आणि अनुवांशिक सुधारणा मजबूत करण्यासाठीच्या धोरणांवर चर्चा केली. या कार्यशाळेत ७०० हून अधिक पशुपालक, पशुवैद्यक, केंद्र आणि राज्ये / केंद्रशासित प्रदेशांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

देशातील स्थानिक पशुधन जाती सुधारण्यासाठी धोरणे आणि पुढील नियोजन करण्याच्या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेत महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने डॉ. शितलकुमार मुकणे (अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन) यांनी सहभाग नोंदवत पशुधन प्रजातींच्या विकासाबाबत महाराष्ट्र सरकारमार्फत करण्यात येत असलेले प्रयत्न व राबविण्यात येत असलेले उपक्रम याबद्दल माहिती दिली.

या कार्यक्रमात ब्रीडर्स असोसिएशनच्या स्थापनेसाठी फ्रेमवर्क देखील सुरू करण्यात आले आहे ज्याचा उद्देश देशभरात जातींचे संवर्धन मजबूत करणे आणि संघटित ब्रीडर्स नेटवर्कला प्रोत्साहन देणे आहे.

श्री राजीव रंजन सिंह उर्फ ललन सिंह, मंत्री, एफएएचडी यांनी या कार्यशाळेच्या माध्यमातून आपले मनोगत व्यक्त करताना देशभरात दूध उत्पादकता वाढविण्याच्या महत्त्वावर भर दिला. त्यांनी नमूद केले की चालू कार्यशाळा या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे, ज्यामध्ये इन-व्हिट्रो फर्टिलायझेशन (आयव्हीएफ) आणि सेक्स सॉर्टेड सीमेन (एसएसएस) सारख्या प्रगत तंत्रज्ञानाद्वारे जाती सुधारणेवर लक्ष केंद्रित केले आहे. या नवकल्पनांचा उद्देश पशुधनाची गुणवत्ता वाढवणे आणि चांगले उत्पादन आणि उत्पन्न मिळविण्यात शेतकऱ्यांना मदत करणे आहे. यावेळी लाळखुरकत रोग (एफएमडी) नियंत्रण आणि निर्मूलनासाठी भारत सरकारच्या प्रयत्नांवरदेखील त्यांनी प्रकाश टाकला.

# नागपुर जिल्ह्यात महाराष्ट्र गोसेवा आयोगामार्फत नोंदणी प्रमाणपत्रांचे वाटप



नागपूर जिल्ह्यातील गोसेवा आयोगाकडे नोंदणी केलेल्या गोशाळेतील संस्थाचालकांना राज्याचे महसूल मंत्री तथा पालकमंत्री, नागपूर मा. ना. श्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच राज्यमंत्री मा. ना. डॉ. श्री. आशिष जयस्वाल यांच्या हस्ते मा. जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर (भा.प्र.से.), मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नागपूर श्री विनायक महामुनी (भा.प्र.से.), सहआयुक्त पशुसंवर्धन तथा सदस्य सचिव गोसेवा आयोग डॉ. मंजुषा पुंडलिक, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, नागपूर विभाग डॉ. सतीश राजू यांच्या उपस्थितीत गोसेवा आयोगाचे नोंदणी प्रमाणपत्र वाटप तसेच १० कोटी वृक्षारोपण कार्यक्रम अंतर्गत वृक्षलागवडीकरिता रोपांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी प्रत्येक गोशाळा संस्थेला १०० वृक्ष लागवडीच्या सूचना देण्यात आल्या. कार्यकमाचे आयोजन जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय डॉ. नितीन फुके यांनी केले.



# ऋषिकेश ते रामेश्वरम गौ राष्ट्र यात्रेचे पुण्यात उत्साहात स्वागत




## गोसेवा आयोगाच्या वतीने आयोजन; गोप्रेमींची मोठ्या संख्येने उपस्थिती

**पुणे:** "गौमाता की जय... भारत माता की जय..." अशा घोषणा देत वंदे गौमातरम - गौ आधारित भारताच्या पुनर्निमाणाच्या दिशेने ६१ दिवसांच्या ऐतिहासिक गौराष्ट्र यात्रेचे पुण्यात आगमन झाले. महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या वतीने औंध येथील गोसेवा आयोग कार्यालयाच्या प्रांगणात या यात्रेचे उत्साहात स्वागत करण्यात आले. ही यात्रा देशभरातील १२ राज्यांतून प्रवास करत एकूण १०,१२७ किलोमीटर अंतर कापणार आहे.

यात्रेचे नेतृत्व भारतीय वेटर्नरी ॲण्ड ॲग्री रिसर्च इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष व डेअरी ॲग्री कन्सल्टंट भारतसिंह राजपुरोहित आणि राष्ट्रीय गौ सेवक संघाचे संस्थापक नरेंद्र कुमार हे करीत आहेत. यात्रा स्वागत प्रसंगी महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष मा. शेखर मुंदडा, सदस्य संजय भोसले, डॉ. नितीन मार्कंडेय आदी उपस्थित होते. महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या वतीने गौराष्ट्र यात्रेच्या आयोजकांचा पुणेरी पगडी, शाल देऊन सन्मान करण्यात आला.

भारतसिंह राजपुरोहित म्हणाले, गायीचा विषय सरकारने समाजावर सोडला अहे. त्यामुळे समाजालादेखील याविषयामध्ये सशक्त व्हायला हवे. गाय हे प्रत्येकाच्या प्रतिष्ठेचे प्रतिक बनेल, असा प्रयत्न आपल्याला करायला हवा. महाराष्ट्रात गोमातेला राज्यमाता म्हणून घोषित करण्यात आले. सर्वच राज्यात अशा प्रकारे गोमातेला राज्यमातेचा दर्जा द्यायला हवा. तब्बल ४२ दिवस आम्ही यात्रेत आहोत. जनजागृती आणि संवादातून गाय हे प्रतिष्ठेचे प्रतिक होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शेखर मुंदडा म्हणाले, देशी गोवंशाचे संगोपन आणि संवर्धन व्हावे, तसेच गोआधारित शेती केली जावी, याविषयावर जनजागृतीपर ही यात्रा पुण्यात आली आहे. गाय वाचली तरच देश वाचेल. आपण तीन मातांना मानतो. त्यामध्ये सर्वप्रथम आपली आई म्हणजेच माता, मायभूमी म्हणजेच भारतमाता आणि गोमाता. त्यामुळे सर्वांचे कर्तव्य आहे की गोमातेचे रक्षण आणि संवर्धन करायला हवे. गोमातेला राष्ट्र मातेचा दर्जादेखील मिळायला हवा, असेही त्यांनी सांगितले.

याप्रसंगी नरेंद्र कुमार, संजय भोसले, डॉ. नितीन मार्कंडेय यांनी मनोगत व्यक्त करताना देशी गोवंशाचे महत्व व देशी गोवंशाच्या दूध, शेण व मुत्रापासून तयार उत्पादनांचे गुणधर्म याविषयी माहिती दिली. महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या सदस्य सचिव तथा सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. मंजुषा पुंडलिक यांनी आभार प्रदर्शन केले.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गोसेवा आयोगाच्या अधिकारी व कर्मचारी वृंदाने विशेष परिश्रम घेतले.



# कार्यरत अश्ववर्गीय प्राण्यांमधील आरोग्य समस्या व त्यांचे व्यवस्थापन: व्यावहारिक मार्गदर्शन


संस्कृती संवर्धन मंडळ, सगरोळी ता. बिलोली, **Federation of Indaian Animal Protection Organisation** व पशुसंवर्धन विभाग, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने "उद्यमिता लर्निंग सेंटर ", कृषि विज्ञान केंद्र, सगरोळी ता. बिलोली येथे पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांसाठी **"कार्यरत अश्ववर्गीय प्राण्यांमधील आरोग्य समस्या व त्यांचे व्यवस्थापन: व्यावहारिक मार्गदर्शन "** या विषयावर एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रशिक्षणाचे उदघाट्न मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक, जिल्हा परिषद, नांदेड श्रीमती मेघना कावली यांनी केले. या प्रसंगी डॉ. नाना सोनवणे, प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, लातूर, डॉ. राजकुमार पडिले, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय,नांदेड , सेवानिवृत्त विस्तार शिक्षण संचालक, माफसू डॉ. अनिल भिकाने सर व अश्व विषयातील तज्ञ उपस्थित होते.




पशुसंवर्धन विभागाच्या नागपुर जिल्ह्यातील सर्व दवाखान्यांच्या अधिकारी व कर्मचारी यांची आढावा सभा दि. २२ जुलै २०२५ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. महामुनी (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. सभेत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्वांना मार्गदर्शन केले व सूचना दिल्या. पशुवैद्यकीय दवाखान्याचे बांधकाम दुरुस्ती बळकटीकरणाकरीता लागणारे साहित्य जिल्हा परिषद सेस फंड तसेच नवीन दवाखान्याच्या बांधकामाकरीता DPC, खनीज, TSP मधून फंड उपलब्ध करून देत असल्याबाबतही ग्वाही दिली.

# सालमोनेल्ला कलर अँटीजेन आता नवीन पॅकिंगमध्ये उपलब्ध



निगेटिव्ह चाचणी



पॉझिटिव्ह चाचणी

**आयव्हीबीपी, पुणे-०७ द्वारा,**

पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्थेच्या (आयव्हीबीपी) वतीने उत्पादित केल्या जाणाऱ्या सालमोनेल्ला कलर अँटीजेनच्या पॅकिंगमध्ये बदल करण्यात आला असून, यावर्षीपासून नवीन पॅकिंगमधील अँटीजेन उपलब्ध झाला आहे. नवीन पॅकिंग हे ५० मिलीचे असून, त्यासाठी ड्रॉपर बॉटलचा वापर करण्यात आला आहे.

कुक्कुट पक्ष्यांमधील सालमोनेल्ला रोगाचे प्राथमिक निदान करण्यासाठी या अँटीजेनचा वापर केला जातो. पशुसंवर्धन विभाग अंतर्गत राज्यस्तरीय रोग अन्वेषण विभाग तसेच विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा यांचेकडून या अँटीजेनचा वापर क्षेत्रीय स्तरावर खाजगी तसेच शासकीय कुक्कुट प्रक्षेत्रावर सालमोनेल्ला रोगाचे निदान करण्यासाठी केला जातो. कुक्कुटजन्य खाद्यपदार्थांच्या मार्फत हा रोग माणसामध्येही पसरत असल्याने त्याचे अचूक व लवकर निदान होणे आवश्यक असते.

सालमोनेल्ला रोगाचे निदान करण्यासाठी कुक्कुट प्रक्षेत्रावरील प्रत्येक पक्ष्याच्या पंखाच्या रक्तवाहिनीतून रक्ताचा एक थेंब घेतला जातो. त्यामध्ये सालमोनेल्ला कलर अँटीजेनचा एक थेंब टाकून मिसळला जातो. बाधित पक्ष्याच्या रक्तात तयार झालेल्या प्रतिपिंडांची ( अँटीबॉडी) अँटीजेनसोबत अग्लुटीनेशन अभिक्रिया होऊन छोट्या गाठी तयार होतात ज्या अँटीजेनच्या जांभळ्या रंगाच्या पार्श्वभूमीवर स्पष्टपणे पाहता येतात.

नवीन पॅकिंगमधील ५० मिली अँटीजेन सरासरी १००० रोगनिदान चाचण्यांसाठी पुरेसा आहे. तसेच नवीन पॅकिंगमध्ये वापरलेल्या सेल्फ पिअर्सिंग ड्रॉपर बॉटलमुळे अँटीजेन वापरास सुलभता आली असून, लहान पॅकमुळे अँटीजेन वाया जाण्याचे प्रमाणही कमी होईल, असा विश्वास पशुवैद्यकीय जैवपदार्थ निर्मिती संस्थेचे सहआयुक्त पशुसंवर्धन डॉ. याह्याखान पठाण यांनी व्यक्त केला आहे.

# रेबीजमुक्त लातूरसाठी एक पाऊल





## जानवळ येथे १४७ श्वान व मांजरींचे लसीकरण, २२ श्वानांवर यशस्वी उपचार

रेबीजसारख्या प्राणघातक विषाणूजन्य रोगावरील प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून लातूर जिल्हा पशुसंवर्धन विभाग व रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे जाणवळ (ता. चाकूर) येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात मोफत रेबीज लसीकरण शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरात १४७ प्राण्यांचे लसीकरण करण्यात आले. त्यापैकी १२५ श्वानांना लस देण्यात आली, तर २२ श्वानांवर उपचार करण्यात आले. जिल्ह्यात लसीकरणासाठी ३० हजार डोस उपलब्ध झाले आहेत.

या शिबिराचे नेतृत्व सहायक आयुक्त डॉ. सुधाकर साळवे, चाकूरचे पशुधन विकास अधिकारी डॉ. बालाजी देवकते यांनी केले. यावेळी प्रा. डॉ. नांदेडकर यांनीही मार्गदर्शन केले. या मोहिमेत स्थानिक पातळीवर सरपंच कुसंगे व ग्रामपंचायत सदस्य यांनी सक्रिय सहभाग घेतला.

या शिबिराच्या अनुषंगाने लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मिना यांनी सर्व नगर परिषद, महानगरपालिका आणि ग्रामपंचायतींच्या सहकार्याने संपूर्ण जिल्ह्यात व्यापक मोफत लसीकरण मोहिम राबविण्याचे निर्देश दिले आहेत. रेबीज प्रतिबंधक लसीकरण ही फक्त प्राण्यांची काळजी नव्हे, तर मानवी आरोग्याचीही सुरक्षितता आहे. यासाठी नागरी व ग्रामीण दोन्ही पातळ्यांवर मोहीम प्रभावीपणे पोहोचवली गेली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

रेबीजविषयी समाजात सजगता निर्माण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाच्या वतीने शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विशेष जनजागृती कार्यक्रम राबविण्याचे नियोजन आहे. विद्यार्थ्यांपासूनच सजगता निर्माण झाली, तर समाजात दीर्घकालीन सकारात्मक बदल घडतील, असा विश्वास विभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

> रेबीज हा उष्ण रक्ताचे प्राणी (विशेषतः की कुत्रा , ससा, माकड, मांजर इत्यादी) चावल्यानंतर होणारा रोग आहे. या रोगामध्ये रोगी पाण्याला घाबरत असल्याने त्यास जलसंत्रास असे म्हणतात. रेबीज हा रोग झाल्यास तो प्राणघातक आहे. मात्र, रोग होण्यापूर्वी लस देऊन त्यापासून संरक्षण करता येते. रेबीज हा एक घातक विषाणूजन्य रोग आहे. पाळीव श्वान व मांजरींचे लसीकरण ही एक सामाजिक जबाबदारी आहे. सर्व नागरिकांनी पुढे येऊन सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. श्रीधर जी. शिंदे यांनी केले.

# राज्यभरात देशी गोवंश संवर्धन दिन उत्साहात साजरा












दिनांक २२ जुलै २०२५ रोजी देशी गोवंश जतन व संवर्धन दिनानिमित्त राज्यभरात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने गोशाळा व पशुवैद्यकीय संस्था अंतर्गत वंध्यत्व निवारण शिबिर व चर्चासत्राचे आयोजन करणेत आले होते. राज्यात देशी गार्यींच्या संख्येत घट होण्याची कारणमिंमासा विचारात घेऊन देशी गार्यींच्या संख्येत वाढ करण्याबरोबरच त्यांची उत्पादनक्षमता व प्रजननक्षमता वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे, त्याचबरोबर देशी गार्यींच्या संवर्धनाचे महत्व तसेच पशुजन्य उत्पादनाचे महत्व ग्राहकाना पटवून देऊन देशी गाय पशुपालकांना बाजारपेठ उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. या बाबी विचारात घेऊन राज्यात दरवर्षी २२ जुलै रोजी " शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन" साजरा करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुषंगाने पशुसंवर्धन विभागाच्या वतीने राज्यभरात विविध ठिकाणी गोवंश जतन व संवर्धन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

सांगली जिल्ह्यात विविध ठिकाणी आयोजित शिबिरात १४२१ गोमातेचे पुजन करुन या कार्यक्रमांची सुरवात करणेत आली. जनावरांची तपासणी करुन उपचार करणेत आले. जनावरांना जंतनाशक व गोचीड औषधे वाटप तसेच १३८ विविध बहुउपयोगी रोपांचे वृक्षारोपण करणेत आले. सदर शिबिरांमध्ये विविध पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीसह ११०२ पशुपालकांनी सहभाग नोंदविला. उपस्थित सर्व पशुपालकांना देशी गोवंश जतन व संवर्धन संदर्भात तांत्रिक मार्गदर्शन करणेत आले. यावेळी पशुपालकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. आटपाडी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुहास बाबर, श्री. विजय पाटील आदींच्या उपस्थितीत देशी गोवंश जतन व संवर्धन दिनानिमित्त देशी गाईंना जंतनाशक औषध, जंतनाशक गोळ्या व चारा बियाणे यांचे वाटप करण्यात आले.

**माध्यमांनी घेतलेली दखल**

लोकमत

# 'लम्पी'च्या मुसक्या आवळण्यासाठी मोबाइल व्हॅन दाराशी

## दिवस-रात्रीच्या मोहिमेतून २४२ जनावरे आजारमुक्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** 'लम्पी' आजाराने पाय पसरविले असताना आतापर्यंत १६ जनावरांचा बळी गेला आहे. त्यामुळे पशुसंवर्धन विभागाने केंद्र शासनाकडून उपलब्ध झालेल्या मोबाइल व्हॅनच्या मदतीने बाधित तालुक्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. दिवस-रात्र उपचारासह लसीकरण मोहीम हाती घेतल्याने ५५५ पैकी २४२ जनावर आजारमुक्त झाले आहेत. त्यामुळे येत्या आठवडाभरात बाधित तालुक्यांना 'लम्पी'मुक्त करण्याच्या दृष्टीने तीन उपाययोजनांवर सर्वाधिक भर दिला जात आहे.

पशुसंवर्धन विभागाकडे ४० टक्के मनुष्यबळ कमी आहे. त्यामुळे पशुसंवर्धन विभागाने तीन उपाययोजनांना प्राधान्य दिले आहे. ९७ टक्के लसीकरण झाले असताना अन्य जनावरांचा शोध, आजारग्रस्त जनावरांवर उपचार आणि गोठ्यांच्या स्वच्छतेसह फवारणीची मोहीम हाती घेण्यात आली आहे. यासाठी बारकाईने नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती देण्यात आली.



'लम्पी'च्या मुसक्या आवळण्यासाठी शेतकऱ्यांच्या दाराशी आलेली मोबाइल व्हॅन.

### जि.प.ही सरसावली

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी प्रत्येक ग्रामपंचायतींना गोठ्यांमधील स्वच्छतेसह फवारणी करावी, यासाठी तालुकानिहाय गटविकास अधिकाऱ्यांना जबाबदारी सोपविली आहे. त्यातून बाधित तालुक्यांमधील ४० ग्रामपंचायतींनी ही मोहीम हाती घेतली आहे.

### जळगाव जिल्ह्यातील 'लम्पी' दृष्टिक्षेपात

| | |
|---|---|
| बाधित | ५५५ |
| बरे झालेले | २९७ |
| मयत | १६ (धरणगाव ५, एरंडो... चोपडा १ व पारोळा ५) |

लम्पीचा सद्यःस्थितीत सर्वाधिक प्रादुर्भाव पारोळा, एरंडोल, धरणगाव तालुक्यांत आहे.

त्यामुळे भुसावळ आणि जामनेरमधील 'मोबाइल व्हॅन' आता या तीन तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या दाराशी जात आहेत.

"पशुपालकांनी लसीकरण, उपचार आणि गोठ्यांच्या स्वच्छतेला प्राधान्य द्यावे. तसेच उंच ठिकाणावर पौष्टिक आहार आणि पाण्याची व्यवस्था केल्यास जनावरांसाठी सोयीस्कर ठरते.

**डॉ. प्रदीप झोड,** उपायुक्त, पशुसंवर्धन विभाग

### ...द्यापीठाने सुचविल्या उपाययोजना

महाराष्ट्र पशुविज्ञान विद्यापीठाचे संचालक डॉ. अनिल भिकाने यांनी लम्पी आजारावर मात करण्यासाठी जिल्ह्यातील यंत्रणेला ऑनलाइन पद्धतीने सूचना दिल्या. घरगुती उपचारातूनदेखील लम्पी आजाराला दूर करता येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

---

पुढारी

# राज्यात लम्पी चर्मरोग नियंत्रणात

## पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे यांची माहिती

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**



राज्यात लम्पी चर्मरोगावरील प्रतिबंधात्मक लसींची गरजेइतकी उपलब्धता आहे. वेळेत लसीकरण पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे लम्पी चर्मरोग नियंत्रणात ठेवण्यास मदत झाल्याची माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी दिली. दरम्यान, लम्पी चर्मरोगावरील लस उत्पादन पुण्यात करण्यात येणार असल्याचेही ते म्हणाले.

पशुसंवर्धन आयुक्तालयाने एप्रिल महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात लम्पी चर्मरोगासह मान्सून पूर्व लसीकरण पूर्ण करण्याबाबतच्या सूचना क्षेत्रियस्तरावर दिल्या. १५ मे अखेर मोहिम स्वरुपात हे काम झाले. राज्यात एकूण १ कोटी १९ लाख ७१ हजार १०० इतक्या लसींचा पुरवठा करण्यात आला असून आवश्यकतेनुसार जिल्हा स्तरावर लस



खरेदी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्याने लसीकरण चांगले झाल्याचे त्यांनी सांगितले. यापुढील काळात लम्पी चर्मरोगावर नियंत्रण आणण्यासाठी लम्पी चर्मरोग प्रतिबंधात्मक लस निर्मितीचे तंत्रज्ञान नवी दिल्ली येथील भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या ॲग्रिनोव्हेट इंडिया या कंपनीकडून उपलब्ध करुन घेतले आहे. त्यामुळे पुण्यातील पशुवैद्यकीय जैव पदार्थनिर्मिती संस्था या पशुसंवर्धन विभागाच्या राज्यस्तरीय संस्थेमध्ये व्यावसायिक तत्वावर लसनिर्मिती करण्यात येणार आहे. भविष्यात राज्य लम्पी चर्मरोगावरील लस उत्पादनामध्ये स्वयंपूर्ण होवून राज्यातील शंभर टक्के गोवर्गीय पशुधनास दरवर्षी प्रतिबंधात्मक लसीकरण करणे प्रस्तावित असल्याचे त्यांनी सांगितले.

My Pune Gramin Edition
Jul 28, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

---

लोकमत

## गुरांना रोगमुक्त ठेवण्यासाठी प्रतिबंधक औषध फवारणी



लोकमत न्यूज नेटवर्क

**कुही :** पावसाळ्याच्या दिवसात जनावरांना विविध आजारांचा सामना करावा लागतो. यासाठी तालुका पशुवैद्यकीय दवाखानामार्फत गोठणगाव येथे बुधवारी (दि.३०) जनावरांवर आणि गोठ्यांमध्ये प्रतिबंधक औषधांची फवारणी करण्यात आली.

कुहीचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ. अविरत सवाईमूल, गोठणगाव पशुधन पर्यवेक्षक पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२चे डॉ. रूपेश खोडनकर यांच्या प्रयत्नातून व ग्रामपंचायत गोठणगावच्या सहकार्याने पावसाळ्यात जनावरांना गोचिड आणि गोमाशीपासून होणारे रोग आणि रोगाचे प्रसार यावर आळा घालण्यासाठी गावातील सर्व जनावरांवर आणि जनावरांच्या गोठ्यात प्रतिबंधक औषधे फवारणी करण्यात आली. पशुसंवर्धन विभागाच्या या स्तुत्य उपक्रमाला पशुपालकांनी उत्तम प्रतिसाद दिला. औषधे फवारणीनंतर सर्व पशुपालकांना जंतनाशक औषधी आणि खनिज मिश्रणाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमासाठी गोठणगावचे सरपंच मुकेश मारबते यांनी पशुवैद्यकीय विभागाचे आभार मानले.

Hello Nagpur Gramin
Page No. 5 Jul 31, 2025
Powered by: erelego.com

---

नवराष्ट्र
www.navarashtra.com

# गोठणगाव येथे पशुसंवर्धन विभागाचे उपचार शिबिर

## परिसरातील पशुपालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पचखेडी, वार्ताहर.** उमरेड-कऱ्हांडला व्याघ्र प्रकल्पालगत असलेल्या गोसेखुर्द प्रकल्पबाधीत गोठणगाव (पुनर्वसन) येथे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) डॉ. अविरत सवाईमुल, पशुधन पर्यवेक्षक पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी 2 गोठणगाव डॉ. रुपेश खोडनकर यांच्या मार्गदर्शनात व गट ग्रामपंचायत गोठणगावच्या सहकार्याने बुधवारी (दि 30) पावसाळ्यात जनावरांना होणाऱ्या आजारांवर प्रतिबंधात्मक शिबिर आयोजित करण्यात आले. पावसाळ्यात जनावरांना गोचिड आणि गोमाशीपासून होणारे रोग आणि रोगाचा प्रसार यावर आळा घालण्यासाठी गावातील सर्व जनावरांवर व जनावरांच्या गोठ्यामध्ये प्रतिबंधक औषध फवारणी करण्यात आली. गावातील पशुपालकांना



जंतनाशक औषधी आणि खनिज मिश्रणाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला गावातील पशुपालकांनी उत्तम प्रतिसाद दिला. गोठणगावचे सरपंच मुकेश मारबते यांनी पशुसंवर्धन विभागाचे विशेष आभार मानले.

Orange City Metro Edition
Jul 31, 2025 Page No. 4
Powered by: Navarashtra.com

लोकमत

# आता पशुपालकांची चांदी! कर्ज, विमा, सवलतींचा मार्ग झाला प्रशस्त

## कृषी व्यवसायाचा समकक्ष दर्जाचा ऐतिहासिक निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य सरकारने ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी पशुपालन व्यवसायास कृषी व्यवसायाचा समकक्ष दर्जाचा ऐतिहासिक निर्णय घेतल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. यामुळे पशुपालकांना आता शेती कर्जाच्या दराने बँक कर्ज मिळणार असून, विमा सुरक्षा, सोलार पंपासाठी सवलत व अन्य शासकीय योजनांचाही लाभ घेता येणार आहे.

मागील काही वर्षात चारा-पाण्याची टंचाई, दुधाला अपेक्षित भाव मिळत नसल्यामुळे जिल्ह्यातील पशुपालन व्यवसाय काहीसा कमी झाला असला, तरी अजूनही अनेक शेतकरी शेतीसोबत दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळी-मेंढी पालन, मत्स्यपालन हा जोडधंदा करतात. पूर्वी या व्यवसायात नुकसान झाल्यास शेतकऱ्यांवर मोठे अरिष्ट ओढावले जात असे. सरकारच्या या नव्या निर्णयामुळे आता कृषी योजनेसाठी मिळणाऱ्यासाठी सर्व सुविधांमुळे पशुपालकांच्या आशा



### पशुपालनात कोणत्या व्यवसायांचा समावेश?

पशुपालन व्यवसायात दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन, शेळी-मेंढी पालन, मत्स्यपाल[न], वराहपालन, मधमाशी पालन यांचा समावेश आहे.

### थेट लाभ कुणाला?

ग्रामीण भागातील लहान, मध्यम व मोठ्या प्रमाणात पशुपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना य[ा] योजनेचा लाभ होणार आहे. ग्रामीण भागातील अनेक शेतकरी जोडधंदा म्हणून पशुपालन व्यवसाय करतात, तर काही कुटुंबे केवळ या[च] व्यवसायावर अवलंबून आहेत. त्या सर्वांना शेतीत मिळणाऱ्या सुविधा आणि सवलतीचा लाभ मिळणार आहेत.

### शेतकऱ्यांप्रमाणेच कर्ज व विमाही मिळणार!

पशुपालकांना स्वस्त दरात क[र्ज] अनुदान मिळेल. विमा योजने[चा] लाभ देखील मिळणार आहे.

याशिवाय, नैसर्गिक आपत्ती अथवा साथरोगांमुळे जनाव[रे], कोंबड्या, वराह दगावल्या[स] नुकसान भरपाईदेखील मि[ळणार]

**माध्यमांनी घेतलेली दखल**

लोकमत

# पशुपालकही आता होणार शेतकरी

पशुपालन व्यवसायाला प्रोत्साहन देण्याचा सरकारचा निर्णय, विविध योजनांचा मिळणार लाभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** आपल्या राज्यात पशुपालन व्यवसायास प्रोत्साहन मिळावे याकरीता त्यास कृषी व्यवसायाचा दर्जा देण्यात आला आहे. त्यामुळे आता राज्यातील पशुपालन व्यवसायाला मोठा दिलासा देणारा हा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. असा निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. जिल्ह्यातील गायी, म्हशी आदी पशुपालन व्यवसायात असलेल्या पशुपालकांना आता शेतकरी म्हणून ओळखले जाणार आहे. त्यास अनुसरून आता त्यांना कृषीच्या विविध योजनांचा लाभ मिळवून आर्थिक विकास साधता येणार आहे.

**पशुपालनात कोणत्या व्यवसायांचा समावेश?**

दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन, वराहपालन, मत्स्यपालन आदी व्यवसाय पशुपालनामध्ये येतात.

**थेट लाभ कुणाला?**

थेट लाभ २५ हजार मांसल कुक्कुट [illegible] हजार अंडी उत्पादक कुक्कुट [illegible] तसेच ४५ हजार क्षमतेच्या [illegible] कुक्कुटपालन [illegible] थेट लाभ होणार आहे. [illegible] जनावरांचे [illegible] शेळीपालन व २०० [illegible] दुग्धव्यवसाय, [illegible] व वराहपालन [illegible] आहे.



**जिल्ह्यातील पशुपालक कुटुंबांची संख्या**

गाय, म्हशी यांची संख्या एक लाख ७२ हजार ४३ आहे. त्यास अनुसरून पशुपालकांची संख्या ५८ हजार ६०० आहे. तर लहान जनावरे म्हणजे शेळी, मेंढी या पशुपालकांच्या कुटुंबांची संख्या ५६ हजार आहे.

**पशुपालकाच्या उत्पादनात होणार वाढ**

पशुपालन व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी पशुपालन व्यवसायाला कृषीचा दर्जा दिला आहे. या निर्णयाचा लाभ राज्यातील सुमारे ७६ लाख ४१ हजार लक्ष पशुपालक कुटुंबांना होईल. या निर्णयामुळे पशुजन्य उत्पादनातून सुमारे ७,७०० कोटी रुपये इतकी वाढ अभिप्रेत आहे.

**शेतकऱ्यांप्रमाणेच कर्ज व विमाही मिळणार!**

१. शेतकऱ्यांप्रमाणेच पशुपालकांना आता कृषीसाठी ज्या दराने वीज आकारणी होते त्यानुसार वीज आकारणीचा लाभ होईल. त्यामुळे गाईचा गोठा, शेळीचा शेड किंवा पोल्ट्री शेडला आता कृषीच्या दराने वीजदर आकारला जाईल. कृषीसाठी सोलार सिस्टीम देण्याची वीजनिर्मितीसाठी योजना आहे.

२. ही धर्तीवर पशुसंवर्धनासाठी लागू केली जाईल. कृषीसाठी कर्ज घेतले तर त्यासाठी व्याजदर हा स्वतंत्र असतो. आता याच व्याजदरात पशुसंवर्धनासाठी कर्ज लागू होईल आदी प्रकारचे फायदे पशुसंवर्धन विभागास कृषीचा दर्जा मिळाल्यामुळे पशुपालकांसाठी लागू होतील.

"सध्या कृषीसाठी जी वीज आकारणी होते त्यानुसार पशुसंवर्धन विभागासाठी वीज आकारणी लागू होईल. गाईचा गोठा, शेळीचा शेड किंवा पोल्ट्री शेडला आता कृषीच्या दराने वीजदर आकारला जाईल. कृषीसाठी सोलार सिस्टीम देण्याची, वीजनिर्मितीसाठी योजना आहे ती आता पशुसंवर्धनासाठी लागू होईल.

**डॉ. वल्लभ जोशी,** उपायुक्त, जिल्हा पशुसंवर्धन, ठाणे

"राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयाचे स्वागत आहे. त्यास अनुसरून आता सरकारी पशु दवाखाने प्रथम श्रेणी व द्वितीय श्रेणीच्या ठिकाणीही पशुधन पर्यवेक्षक अधिकारी द्यावेत. याआधी लाइव्ह स्टॉक सुपरवायझर कार्यरत होते, आता त्या ठिकाणी बीव्हीएससी दर्जाचा अधिकारी नेमून त्या ठिकाणचे दवाखाने अद्ययावत करता येऊ शकतात. त्यामुळे हरितक्रांतीबरोबर दुसरी श्वेतक्रांती निर्माण होऊ शकते.

**प्रकाश भोगरव,** दुग्ध उत्पादक, शहापूर

Hello Thane Page No. 4 Jul 18, 2025

लोकमत

# पशुपालकांना सुवर्णसंधी: राज्यात पशुधनाला कृषी व्यवसायाचा दर्जा!

योग्य प्रशिक्षण, आर्थिक मदतीसोबत बाजारपेठ मिळाल्यास हा व्यवसाय ठरणार फायदेशीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** महाराष्ट्र सरकारने पशुपालन व्यवसायाला आता कृषी व्यवसायाचा दर्जा दिला आहे. त्यामुळे राज्यातील लाखो पशुपालकांना आर्थिकदृष्ट्या मोठा दिलासा मिळणार आहे. असा निर्णय घेणारे महाराष्ट्र देशातील पहिलं राज्य ठरले आहे. या निर्णयामुळे पशुपालन हा आता केवळ दुय्यम व्यवसाय न राहता शाश्वत उत्पन्नाचा स्रोत म्हणून समोर येणार आहे.

यात गायी-म्हशींचं दूध उत्पादन, शेळीपालन, मेंढीपालन, कुक्कुटपालन (कोंबडीपालन), डुक्कर पालन तसेच मधमाशीपालन यांसारख्या उपव्यवसायांचा समावेश आहे. जिल्ह्यातील पशुपालन शेतकऱ्यांचा पूरक व्यवसाय असून, हा मोठ्या प्रमाणावर ग्रामीण कुटुंबांचा उपजीविकेचा आधार आहे.

मात्र, या व्यवसायासमोर अनेक अडचणी आहेत. चाराटंचाई, पशुवैद्यकीय सेवांचा अभाव अशा अनेक संकटांचा सामना पशुपालकांना करावा लागतो.

जिल्ह्यात गत पाच वर्षांत पशुधनाची संख्या काहीशी घटली.

देशी जनावरे पाळण्याचे प्रमाण कमी झालेले आहे. अनेक शेतकरी दुग्ध व्यवसायाकडे वळले असल्याने संकरित जनावरे पाळत आहेत. मात्र, हे प्रमाण कमी आहे.



### नव्या निर्णयात कोणते व्यवसाय समाविष्ट?

दुग्धव्यवसाय (गायी-म्हशी पालन), शेळी-मेंढीपालन, कोंबडीपालन व कुक्कुटपालन, डुक्कर पालन, मधमाशी पालन (अपिकल्चर), मत्स्यव्यवसाय (काही ठिकाणी समावेश शक्य) या सर्व व्यवसायांना आता अधिकृत कृषी व्यवसायाचा दर्जा मिळणार आहे.

### पशुपालन व्यवसायाला मिळाला आता कृषी दर्जा

ग्रामीण भागात पशुपालन हे कुटुंबाच्या उपजीविकेचा भाग आहे. अनेक शेतकरी शेतीसोबत दुग्धव्यवसाय, शेळी-मेंढी पालन करतात. मात्र, त्यांना बँकांकडून किंवा शासनाकडून 'कृषी' या वर्गात मदत मिळत नव्हती. आता पशुपालकांना शेतकऱ्यांप्रमाणेच स्वस्त दरात कर्ज, कृषी विमा योजना, सबसिडी मिळणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना आता योजनांचा लाभ मिळणार आहे.

### पशुपालकांच्या उत्पादनात वाढ कशी होईल?

नवीन तंत्रज्ञान व प्रशिक्षणाचा वापर पशुवैद्यकीय सेवा, जनावरांच्या जातीतील सुधारणा, फीड मॅनेजमेंट यामधून उत्पादनवाढीला गती मिळेल. लघुउद्योग, दुग्धप्रक्रिया, चिलिंग प्लांट, बायो गॅस यांसारख्या संधी वाढतील. जिल्ह्यात पशुधनाची संख्या मोठी असून, योग्य प्रशिक्षण, आर्थिक मदत आणि बाजारपेठ मिळाल्यास हा व्यवसाय अधिक फायदेशीर ठरू शकतो.

### कोणते लाभ मिळणार?

**बँक कर्ज सुलभ :** पशुपालकांना आता शेती कर्जाच्या रेटप्रमाणे कमी व्याजदराने कर्ज मिळू शकणार आहे.

**विमा संरक्षण उपलब्ध :** पशुधन विमा योजनांना गती मिळेल. जनावरांच्या मृत्यू, आजार आदींसाठी विमा सुरक्षा वाढेल.

**अनुदान व शासकीय योजना :** डेअरी प्रकल्प, गोठा उभारणी, गोठ्यांसाठी सौरऊर्जा, शेळीपालनासाठी स्टॉल फीडिंग यांसारख्या योजनांत अधिक लाभ मिळू शकेल.

**पशुधन उत्पादनवाढीला चालना :** दूध, अंडी, मांस यांचे उत्पादन वाढवण्यासाठी तांत्रिक साहाय्य, प्रशिक्षण व मार्केटिंग मदत मिळणार. धुळे जिल्ह्यात प्रामुख्याने गायी व म्हशींचे दुग्धव्यवसाय सर्वाधिक आढळतात.

**पशुपालन व्यवसाय उपजीविकेचा भाग**

ग्रामीण भागात पशुपालन हे कुटुंबाच्या उपजीविकेचा भाग आहे. अनेक शेतकरी शेतीसोबत दुग्धव्यवसाय, शेळी-मेंढीपालन करतात. मात्र, बँकांकडून किंवा शासनाकडून मदत मिळत नव्हती.

Hello Dhule Page No. 3 Jul 16, 2025 Powered by: erelego.com

छत्रपती ... दि. १८ जु[लै]

# पशुपालकही शेतकरी म्हणून आता मिरवणार !

[गा]यी, म्हशींचे पालनही सरकारला मान्य; शेतीप्रमाणेच कर्जही, विम्याचा लाभ

लोकमत न्यूज नेटवर्क

[...]णी : राज्यात पशुपालन व्यवसायास [प्रोत्सा]हन मिळावे याकरिता त्यास कृषी [व्यव]सायाचा दर्जा देण्यात आला आहे. [राज्या]तील पशुपालन व्यवसायाला मोठा [दिला]सा देणारा हा निर्णय असून असा [निर्णय] घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले [राज्य] ठरले आहे. जिल्ह्यात पशुपालन [व्यवसा]याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. [या] निर्णयामुळे त्यांच्या उत्पादनात [वाढीब]रोबरच पशुपालक कुटुंबांना [शेतकर]ी म्हणून मिरवता येणार आहे. [पशुपाल]न हा व्यवसाय शेतीपूरक [व्यवसा]य म्हणून ओळखला जातो. [जिल्ह्या]त मोठ्या प्रमाणावर ग्रामीण [कुटुंबांच्]या उपजीविकेचा आधार आहे. [या] व्यवसायासमोर अनेक अडचणी [आहेत.] चाराटंचाई, पशुवैद्यकीय सेवांचा [अभाव] अशा अनेक संकटांचा सामना [पशुपाल]कांना करावा लागतो. दरम्यान, [...] राज्य विधिमंडळाच्या [अधिवे]शनात पशुपालन व्यवसायाला [कृषी व्य]वसायाचा दर्जा देण्याची घोषणा [केली] आहे. गायी, म्हशींचे दूध उत्पादन, [शेळीपाल]न, मेंढीपालन, कुक्कुटपालन, [वराहपा]लन तसेच मधमाशीपालन [या व्यव]सायाचाही समावेश असणार [आहे. ...]तच शेतकऱ्यांचा पशुपालन हा [जोडव्]यवसाय आहे. ग्रामीण भागातील [अनेक] कुटुंबांचा भार या पूरक [व्यवसा]यावरच असतो.



### शेतकऱ्यांप्रमाणेच कर्ज व विमाही मिळणार!

**बँक कर्ज सुलभ आणि स्वस्त :** पशुपालकांना आता शेती कर्जाप्रमाणे कमी व्याजदराने कर्ज मिळू शकते. विमा संरक्षण, पशुधन विमा योजनेला गती, डेअरी प्रकल्प, गोठा उभारणी, शेळीपालनासाठी स्टॉल फिडिंग यासारख्या योजनांत, दूध, अंडी, मांस यांचे उत्पादन वाढविण्यासाठी तांत्रिक सहाय्य प्रशिक्षण, मार्केटिंग मदत मिळण्यास मदत होणार आहे.

"या निर्णयामुळे पशुपालन व्यवसायांना अधिकृत स्वरूप प्राप्त झाले आहे. शासनाच्या विविध योजना या घटकांपर्यंत पोहोचविण्याचे काम पशुसंवर्धन विभागाकडून केले जात आहे.

**के.डी. सांगळे,** सहायक उपायुक्त, पशुसंवर्धन विभाग

### उत्पादनात होणार वाढ

या निर्णयामुळे पशुपालकांना आधुनिक तंत्रज्ञान आणि दर्जेदार खाद्य पुरवठा करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल, ज्यामुळे उत्पादनात लक्षणीय वाढ होण्याची शक्यता आहे.

### लाभ कुणाला?

या निर्णयामुळे सर्वच पशुपालकांना थेट फायदा होणार आहे. ग्रामीण भागातील अनेक कुटुंबाचा उदरनिर्वाह याच व्यवसायावर अवलंबून असल्याने, त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होण्यास मदत होईल.

### जिल्ह्यात पशुपालक कुटुंबांची संख्या?

जिल्ह्यात नुकतीच २१ वी पशुगणना पूर्ण झालेली आहे. पण, याचा अधिकृत आकडा अद्याप जाहीर झालेला नाही. तरीही जिल्ह्यात ४ लाखांहून अधिक पशुधन आहे. मोठ्या प्रमाणात पशुपालक आहेत. या निर्णयामुळे पशुपालन व्यवसायास प्रोत्साहन मिळणार असून पशुधनाची संख्याही अधिक आहे.

# पशुसंवर्धनाला कृषीचा दर्जा
# ग्रामीण विकासाला मिळणार नवी ऊर्जा





**डॉ. शैलेश केंडे**
अवर सचिव
महाराष्ट्र शासन, पशुसंवर्धन विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०००३२



**डॉ. प्रशांत भड**
उपआयुक्त तथा सदस्य सचिव
महाराष्ट्र गोजातीय प्रजनन अधिनियम,
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
औंध, पुणे-६७

राज्यामध्ये २० व्या पशुगणनेनुसार गायवर्गीय पशुधन १,३९,९२,३०४ व म्हैसवर्गीय पशुधन ५६,०३,६९२ असे एकुण १,९५,९५,००० इतके पशुधन आहे. भारत पशुधन प्रणालीवरील नोंदीनुसार गायवर्गीय पशुधन व म्हैसवर्गीय पशुधन सांभाळणारे ६०.३७ लक्ष कुटुंबांना दुग्धव्यवसायातून अर्थाजन होत आहे. तसेच शेळ्या सांभाळणारे ४,६६,९९२ तसेच मेंढीपालन करणारे ८२,१७४ कुटुंब आणि मांसल व अंडी देणाऱ्या कोंबड्यांचे संगोपन सुमारे ३६,५०० पोल्ट्री फार्म्सव्दारे केले जात आहे. पशुपालकांच्या उत्पन्नात वाढ होण्याबरोबरच राज्याच्या सकल उत्पन्नात पशुसंवर्धन व्यवसायाचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टिकोनातून पशुपालकांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच स्थानिक रोजगार निर्मिती व्हावी, यासाठी पशुसंवर्धन व्यवसायास “कृषि समकक्ष दर्जा” देण्यास महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली आहे. या ऐतिहासिक निर्णयाचे महत्व व पशुसंवर्धनाच्या व्यवसायावर होणारे अनुकूल परिणाम, याविषयी....

शेती क्षेत्रावर उपजिविका करणारी लोकसंख्या ही प्रामुख्याने ग्रामिण भागातील आहे. राज्याच्या सकल देशांतर्गत उत्पन्नात जिल्हानिहाय सहभाग विचारात घेतल्यास मुंबई व मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, पुणे व नागपूर या शहरीकरण झालेल्या ६ जिल्ह्यांचा वाटा ५६ टक्के असून, उर्वरित ३० जिल्ह्यांचा वाटा ४४ टक्के आहे. या ३० जिल्ह्यांमध्येच शेती क्षेत्रावर उपजिविका करणारे कार्यक्षम वयोगटातील लोकसंख्या एकवटली आहे. सदर कार्यक्षम वयोगटातील लोकसंख्येस त्यांच्या स्थानिक क्षेत्रातच रोजगार उपलब्ध व्हावा, त्याव्दारे पशुपालक शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ होऊन राज्याच्या उत्पन्नातही वाढ व्हावी, या उद्देशाने पशुसंवर्धन व्यवसायाकडे केवळ शेतीपुरक व्यवसाय या मर्यादित दृष्टिकोनातून न पाहता पशुसंवर्धन व्यवसायात उद्योजकता निर्माण करण्याची आवश्यकता आहे. देशात अद्यापपर्यंत कोणत्याही राज्यात पशुसंवर्धन व्यवसायास कृषि व्यवसायाचा दर्जा दिलेला नाही. तथापि काही राज्यात थोड्याफार प्रमाणात वेगवेगळ्या सवलती देण्यात येत आहे. पशुसंवर्धन व्यवसायास कृषि व्यवसायाचा दर्जा देण्याचा निर्णय घेतल्याने, असा ऐतिहासिक निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य ठरले आहे.

भारताची अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान असून, पशुसंवर्धनाला कृषी अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून ओळखले जाते. भारतीय पशुधन क्षेत्र हे जगातील सर्वात मोठे असून, जगातील ११.६ टक्के पशुधन भारतात आहे. पशुपालनातून मिळणाऱ्या अतिरिक्त व स्थिर उत्पन्नामुळे पशुपालन कृषी अर्थव्यवस्थेचा कणा आहे. ज्या राज्यांमध्ये पशुधन उत्पन्नाचा वाटा जास्त आहे, तेथे गरिबीचे प्रमाण कमी, मात्र ज्या राज्यांमध्ये पशुधन उत्पन्नाचा वाटा कमी तेथे गरिबीचे प्रमाण जास्त आहे. पशुसंवर्धन व्यवसायामुळे महिला सक्षमीकरणात मदत होऊन अनेक सीमांत शेतकऱ्यांना उपजीविकेचे साधन निर्माण होते. परकीय चलन तसेच प्रथिनयुक्त अन्न पुरविण्यात पशुपालन व्यवसायाचे मोठे योगदान आहे.



**पशुपालन व्यवसायास प्रोत्साहन देण्याची आवश्यकता**

शारीरीक स्वास्थ्यास प्रथिने व इतर घटकांची आवश्यकता असल्याने मानवी आहारात त्याचा समावेश असणे गरजेचे आहे. पशुजन्य उत्पादनाव्दारे उदा. दूध व दुग्धजन्य पदार्थ, अंडी व मांस या उत्तम दर्जाच्या प्रथिनांची उपलब्धता होण्यासाठी पशुपालन व्यवसायास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. या व्यवसायातून मोठी रोजगारनिर्मिती व आर्थिक उलाढाल होत असल्याने ग्रामीण विकासाचे चक्र सतत गतीशील राहिले आहे. अर्थव्यवस्थेतील योगदान व स्थान लक्षात घेता कृषी समकक्ष दर्जामुळे पशुसंवर्धनाच्या व्यवसायास प्रोत्साहन मिळणार आहे.

निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नात दिवसेंदिवस काहीशी अस्थिरता पाहावयास मिळत आहे. त्यामुळे हमखास उत्पन्न देणाऱ्या पशुसंवर्धनाच्या व्यवसायाकडे शेतकरी आकर्षित झाला आहे. पशुसंवर्धनाच्या व्यवसायातून शेतकरी-पशुपालक बांधवांना दूध, मांस, अंडी, लोकर यांचे उत्पादन मिळू लागले आहे. या उत्पादनांच्या विक्रीतून शेतकऱ्यांच्या हातात चार पैसे शिल्लक राहू लागले आहेत. त्यामुळे प्रारंभी पूरक व्यवसाय म्हणून केला जाणारा पशुसंवर्धनाचा व्यवसाय आता शेतकऱ्यांना शाश्वत अर्थाजनाची संधी उपलब्ध करुन देणारा एक प्रमुख व्यवसाय बनणार आहे.




दूध उत्पादनात
**५ वा** क्रमांक
१६.०४
मि.मे.टन




अंडी उत्पादनात
**७ वा** क्रमांक
७७९ कोटी अंडी



मांस उत्पादनात
**३ रा** क्रमांक
१.१५ मि.मे.टन



| | |
|---|---|
| **पशुसंवर्धन विभागाचा राज्य उत्पन्नातील वाटा** | **2.4 %** |
| **कृषि विभागाचा राज्य उत्पन्नातील वाटा** | **24 %** |

महाराष्ट्र राज्य पशुसंवर्धनविषयक अनेक बाबींत देशात आघाडीवर आहे. कुक्कुटपालन व्यवसायात महाराष्ट्र राज्य पाचव्या, म्हैस-मेंढीपालनात सातव्या तर शेळीपालनात सहाव्या क्रमांकावर आहे. पशुसंवर्धन उत्पादनांचा विचार केल्यास मांस उत्पादनात दुसऱ्या, दूध-अंडी उत्पादनांत सातव्या तर लोकर उत्पादनात राज्य नवव्या स्थानी आहे. राज्याच्या उत्पन्नात पशुसंवर्धनाचा वाटा २.४ टक्के, तर कृषी क्षेत्रात निव्वळ पशुसंवर्धनाचा वाटा तब्बल २४ टक्के आहे.

राज्याची अर्थव्यवस्था २०२८ पर्यंत १ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहचविण्यासाठी ज्या ७ घटकांना चालना देण्याची आवश्यकता स्पष्ट केली आहे, त्यामध्ये शेती व शेतीपुरक व्यवसायांचा समावेश आहे. शेतीपूरक व्यवसायामध्ये या विभागाशी संबंधित असलेल्या दुग्धव्यवसायाचा समावेश आहे. सन २०२२-२३ मध्ये दुग्धोत्पादनाबाबत भारतामध्ये महाराष्ट्राचा सहावा क्रमांक लागतो. देशात दरडोई दूध सेवनाचे प्रमाण ४५९ ग्रॅम प्रती व्यक्ती प्रती दिन असे असून, पंजाबमध्ये हेच प्रमाण १२८३ ग्रॅम प्रती व्यक्ती प्रती दिन आहे. राज्यात हे प्रमाण ३२९ ग्रॅम प्रती व्यक्ती प्रति दिन इतके आहे. त्यामुळे राज्यात दुधाच्या उत्पादनात वाढ करण्यास मोठा वाव आहे.

राज्यातील अंड्यांचा प्रती दिन तूट १.०० ते १.२५ कोटी असून, ही तूट तामिळनाडू, तेलंगणा व आंध्रप्रदेशातून अंडी मागवून भागविली जाते. तसेच राज्यातील दरडोई मांस उपलब्धता ७.३९ किलो प्रती वर्ष इतकी असून, भारतीय आरोग्य परिषदेने केलेली शिफारस विचारात घेता दरडोई मांस उपलब्धतेची वार्षिक तूट प्रती व्यक्ती ३.४१ किलो इतकी आहे. ही तूट राजस्थान व मध्यप्रदेशातून शेळ्यांची आयात करुन भागविली जाते.

ग्रामीण भागात रोजगार व स्वयंरोजगाराची निर्मिती करण्याची मोठी क्षमता पशुसंवर्धनाच्या व्यवसायात असल्याने पशुसंवर्धन विभागाने राज्य शासनाकडे पशुसंवर्धनाच्या व्यवसायाला कृषीसमकक्ष दर्जा देणेबाबत पाच महिन्यांपुर्वी प्रस्ताव सादर केला होता. तत्पुर्वी विभागाच्या पुनर्चनेसही मान्यता मिळाल्याने गावपातळीपासून ते विभाग-राज्यस्तरावर विभागाचे मनुष्यबळ, पद आणि श्रेणी तसेच विभागाच्या नावासह यंत्रणेतही बदल करण्यात येत आहे. विभाग पुनर्रचनेनंतर लगेचच पशुसंवर्धनाला कृषीचा दर्जा देण्याबाबतची मागणी मान्य होणे, हे राज्य शासनाने विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी उचललेले प्रासंगिक व तितकेच महत्वपूर्ण पाऊल म्हणावे लागेल. पशुसंवर्धनाला कृषीचा दर्जा मिळाल्याने पशुसंवर्धन विभागासाठी अधिक आर्थिक तरतूद केली जाईल, तसेच कर, कर्ज, व्याज, अनुदानातही कृषीप्रमाणे सवलत मिळेल. त्यातून पशुसंवर्धन उद्योजकता वाढीस लागेल आणि पशुपालकांना आर्थिक स्थैर्य लाभेल.

पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देताना सदर निर्णयाचा लाभ लघु व मध्यम स्वरुपाचा व्यवसाय करणाऱ्या पशुपालकांना होण्याच्या दृष्टीने खालील क्षमतेच्या पशुपालन व्यवसायिकांचा समावेश करण्यात आला आहे.

१. २५,००० पर्यंत मांसल कुक्कुट पक्षी / ५०,००० पर्यंत अंड्यावरील कुक्कुट पक्षी क्षमता
२. ४५,००० पर्यंत क्षमतेच्या हॅचरी युनिट
३. १०० पर्यंत दुधाळ जनावरांचा गोठा
४. ५०० पर्यंत मेंढी / शेळी गोठा
५. २०० पर्यंत वराह

HON. BALASAHEB THACKERAY AGRIBUSINESS & RURAL TRANSFORMATION (SMART) PROJECT

मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प




आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय बाजारपेठांमध्ये मांस व अंडी यांची दिवसेंदिवस वाढत असलेली मागणी लक्षात घेता, शेळी मांस व दुग्धजन्य पदार्थ व अंडी उत्पादनाची मुल्यवर्धित सुरक्षित अन्न प्रणाली विकसित करण्याचे पशुसंवर्धन विभागाचे उद्दिष्ट आहे. यासाठी अत्यल्प, अल्प भुधारक शेतकरी व कृषि उद्योजकांना केंद्रस्थानी ठेवून सर्वसमावेशक व स्पर्धात्मक पशु उत्पादनाच्या मुल्य साखळ्यांच्या विकासाला मदत करणे आणि उद्योगांसाठी नवीन व संघटीत बाजारपेठांमध्ये व्यापाराच्या संधी मिळवून देण्यासाठी जागतिक बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र राज्य कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे. प्रकल्प कालावधी सन २०२०-२१ ते २०२६-२७ असा ७ वर्ष आहे.



**डॉ. समीर बोरकर**
प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन
पुणे विभाग, पुणे-४११०६७

१. **पशुधन विभागाचा बृहत विकास आराखडा (Roadmap) तयार करणे:** हा उपघटक राबविणासाठी देश व विदेश पातळीवर प्रकल्पाशी निगडीत असलेल्या नामांकित तांत्रिक सेवा प्रदाता संस्था यांचेसोबत ज्ञानाधिष्ठीत सहयोगी म्हणून International Livestock Research Institute, Kenya यांचा सहभाग असणार आहे. सदर संस्थेची नेमणूक करणे करिता संस्थेने सादर केलेला प्रस्ताव स्मार्ट प्रकल्पामार्फत जागतिक बँकेच्या मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.

२. **प्रकल्पांतर्गत देण्यात येणारे प्रशिक्षण:**
- अ) विक्रेता व खरेदीदार यांची भेट कार्यशाळा
- ब) आदर्श तांत्रिक पशुसंवर्धनविषयक प्रशिक्षण
- क) शेती शाळेमध्ये प्रशिक्षण
- ड) पशुसखी प्रशिक्षण

### प्रकल्प किंमत

| अ. क्र. | प्रकल्प घटक | आर्थिक हिस्सा व अनुदान मर्यादा ( रु . लाखात) | |
|---|---|---|---|
| | | एकूण | अभिप्राय |
| एकूण प्रकल्पामध्ये, पशुसंवर्धन विभागास पशुधन क्षेत्रातील गुंतवणूक व मुल्य साखळी विकसित करण्यासाठी | | | |
| १ | पशुधन क्षेत्रातील गुंतवणूक | १४४६.० | |
| २ | पशुसंवर्धन विस्तार व मुल्यसाखळी विकास प्रशिक्षण | ३४२.७३ | पशुसंवर्धन विभाग व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व महिला आर्थिक विकास महामंडळ हे घटकाचे लाभार्थी आहेत. |
| | एकूण पशुसंवर्धन | १७८८.७३ | |
| ३ | पशुसंवर्धन विषयक उपप्रकल्प (PP & MAP) | | शेतकरी उत्पादक कंपनी यांचा ४० टक्के आर्थिक सहभाग व ६० टक्के स्मार्ट प्रकल्पाचे उद्घाटन |

शेतकरी उत्पादक कंपनी स्वयंसहाय्यता गट व उत्पादक, निर्यातदार व इतर भागधारकांशी ओळख व भेट घडवून आणणे; जेणेकरून त्यांच्या उत्पादनांच्या कामकाजाच्या नियोजनातील अंतर व बाजारपेठेतील अपयशाची कारणे ओळखता येईल. यासाठी ही कार्यशाळा जिल्हास्तरावर घेण्यात येत आहे. कोल्हापूर, गोंदिया व अहमदनगर जिल्ह्यात अशा कार्यशाळा आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

आदर्श तांत्रिक पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण हे महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपुर यांच्यामार्फत देण्यात येत आहे. सदरच्या प्रस्तावास जागतिक बँकेची मंजुरी प्राप्त झालेली असून, स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला येथे पुर्ण करण्यात आले आहे.

शेती शाळेमध्ये मंजूर उपप्रकल्पातील सभासदांना शेळी व कुक्कुटपालनाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. सेवार्थ शेतकरी उत्पादक कंपनी, देवरी जिल्हा गोंदिया येथे शेती शाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. पशुसखींना शेळी व परसातील कुक्कुटपालन, किरकोळ प्रथोमपचार व शेळ्या आणि कुक्कुट पक्ष्यांना लसीकरण, प्रजनन, शेडचे व्यवस्थापन, कृषि व कृषिपूरक व्यवसायाची वृध्दी व त्यातून उपजिविकेचे स्रोत निर्माण करणे व विपणानाव्दारे त्याची बाजारांशी जोडणी करणे, नोंदी व हिशोब ठेवणे आणि उत्पादन नियोजनावर व्यापक १५ दिवसांचे महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,नागपुर यांचेमार्फत ७५० पशुसखींच्या प्रशिक्षणास जागतिक बँकेची मंजुरी प्राप्त झाली आहे. आतापर्यंत १४५ पशुसखींना प्रशिक्षित करण्यात आलेले आहे. या प्रशिक्षित पशुसखींमार्फत शेतकरी उत्पादक कंपनीतील सदस्यांना शेतकरी शेतीशाळेमध्ये प्रशिक्षण दिले जाईल. आतापर्यंत ५२० शेतकऱ्यांना प्रशिक्षणाचा लाभ मिळाला आहे.

३. **लोकसहभागातून शेळी पैदास कार्यक्रम** -मंजूर उपप्रकल्पतील शेतकरी उत्पादक संस्थेतील सदस्यांना ३५० सुपर स्मार्ट उस्मानाबादी बोकड पुरविण्याचे प्रस्तावित आहेत. बोकड ५० टक्के अनुदानावर रु. ५०००. (विमा शुल्कासहीत) पुरवठा केले जाईल. या किंमती व्यतिरिक्त रुपये ५ हजार आहार आणि व्यवस्थापनासाठी दिले जातील. तसेच रुपये १०० अतिरिक्त खर्च रोग तपासणी व लसीकरणासाठी पशुसखींना दिले जातील. या कार्यक्रमामध्ये पुरवठा केलेले बोकड शेतकऱ्यांकडे असलेल्या शेळ्यांच्या प्रजननासाठी वापरले जातील आणि याद्वारे चांगली वाढ आणि शुध्द जातीचे गुण असलेल्या उस्मानाबादी शेळ्या /बोकड निर्माण होतील. त्यांच्या जन्मापासूनच्या नोंदी, जसे संतती वाढीचा दर, रोग, उपचार, आहार आणि इतर संबंधित तपशिल पशुसखींमार्फत नोंदविला जाईल. या सुपर स्मार्ट बोकडची निवड स्पर्धात्मक वजन वाढीच्या आधारे केली जाईल. सदर घटकाकरिता बोकड निवडीसाठी उस्मानाबाद भागात जाऊन निवडीच्या मार्गदर्शक सूचना निगर्मित करण्यात आल्या आहेत. बीड व धाराशिव जिल्ह्यात जावून मार्गदर्शन करण्यात आले आहे.






**४. उत्पादक भागीदारी उपप्रकल्प:** शेळीचे मांस व दूध आणि परसातील कुक्कुटपालनाद्वारे उत्पादित अंडी या घटकांशी संबंधित मूल्यसाखळी विकसित करण्यात येत आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीबरोबरच उत्पन्नाची प्रत सुधारणे व त्यांना नवीन बाजाराशी जोडणे आणि शेतकऱ्यांचे निव्वळ उत्पन्न वाढवणे हे या घटकाचे उदिष्ट आहे. सद्यस्थितीत, स्मार्ट प्रकल्पांतर्गत पशुसंवर्धन विभागाच्या १७ उत्पादक भागीदारी उपप्रकल्पांना अंतिम मंजुरी मिळाली आहे व ३ उपप्रकल्प अंतिम मंजुरीसाठी स्मार्ट प्रकल्पाला सादर करण्यात आले आहेत, तसेच ६५ प्रकल्पांना तत्वत: प्राथमिक मंजुरी मिळाली आहे. यापैकी १० प्रकल्पांना रु. ४५५.४४ लक्ष निधी वितरीत केला असून, त्यापैकी रु. ३३९.६२ लक्ष निधी खर्च झालेला आहे.

**स्मार्ट प्रकल्पांतर्गत घटक निहाय अंमलबजावणी सद्यस्थितीः**

- पशुसंवर्धन विभागाचा पुढील २५ वर्षाचा बृहत विकास आराखडा ILRI मार्फत करण्यास जागतिक बँकेने सहमती दिली होती, परंतु सदर घटक रद्द करणे प्रस्तावित केलेले आहे.
- पशुसंवर्धन विभागाचे इंटीग्रेटेड पोर्टल (Traceability) घटकाच्या TOR ला जागतिक बँकेची मंजुरी प्राप्त आहे, याचा RFP तयार केलेला असून, संपादन प्रक्रिया राबविणे अंतिम टप्प्यात आहे.
- आदर्श तांत्रिक पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण (Good Animal Husbandry Practice) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ यांच्यामार्फत घेण्यात येत असून, स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला येथे आतापर्यंत १५० अधिकारी यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे.
- पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांना पशुधन उत्पादित पदार्थाची अन्नसुरक्षा बाबतचे प्रशिक्षण माहे डिसेंबर २०२४ पासून राबवणे नियोजित आहे.
- महाराष्ट्र व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (माफसू), नागपूर यांच्यामार्फत पशुसखींना शेळी व परसातील कुक्कुटपालनाबाबत व्यापक प्रशिक्षण देण्यात येत आहे.
- सद्यस्थितीत ६ तुकड्याचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे, आतापर्यंत एकूण १४५ पशुसखी प्रशिक्षित झाल्या आहेत.
- विक्रेता व खरेदीदार यांची भेट कार्यशाळा कोल्हापूर, गोंदिया, सोलापूर व अहिल्यानगर जिल्ह्यात आयोजित करण्यात आलेली आहे. सदर भेट कार्यशाळामध्ये ५५३ पशुपालक व विक्रेता यांनी सहभाग घेतला आहे.
- शेती शाळेमध्ये मंजूर उपप्रकल्पातील सभासदांना शेळी व कुक्कुट पालनाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. गोंदिया व अहमदनगर येथे शेती शाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. आहे. सदर शेती शाळेमध्ये एकूण १२५ पशुपालकांनी सहभाग घेतला आहे.
- लोकसहभागातून शेळीपैदास कार्यक्रमांतर्गत मंजूर उपप्रकल्पातील शेतकरी उत्पादक संस्थेतील सदस्यांना ३५० सुपर स्मार्ट उस्मानाबादी बोकड पुरविण्याचे प्रस्तावित आहे.
- शेळीचे मांस व दूध, परसातील कुक्कुट पालनाद्वारे उत्पादित अंडी आणि चारा प्रक्रिया या घटकाविषयक मूल्यसाखळी विकसित करण्यात येणार आहे.
- शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीबरोबरच उत्पन्नाची प्रत सुधारणे व त्यांना नविन बाजाराशी जोडणे आणि शेतकऱ्याऱ्यांचे निव्वळ उत्पन्न वाढवणे हे या घटकाचे उदिष्ट आहे.
- स्मार्ट प्रकल्पातंर्गत ५१ उपप्रकल्पांना प्राथमिक मंजुरी प्राप्त असून, २९ उपप्रकल्प (DPR) यांना अंतिम मंजुरी प्राप्त झाली आहे.
- २९ उपप्रकल्प प्रस्तावित प्रकल्प मूल्य हे रु.४७३५.६७ लक्ष असून, एकूण मंजूर अनुदान रक्कम रु.२८४४.७० लक्ष आहे.
- अंतिम मंजूर उपप्रकल्प पैकी १५ उपप्रकल्पांना एकूण रु. ६९६.८४ लक्ष निधी वितरित करण्यात आलेला आहे.

# लम्पी चर्मरोगाचे निर्मुलन

## सामुहिक प्रयत्नांनी मिळवूया नियंत्रण





**डॉ. गणेश सि. निटूरे**
पशुधन विकास अधिकारी,
तालूका लघु पशुवैद्यकीय
सर्वचिकित्सालय, रेणापूर
संपर्क ९९७०१२३२२०

लम्पी त्वचा आजार हा देवी वर्गातील कॅप्रीपॉक्स प्रवर्गातील विषाणूमुळे पसरतो. हा साथीचा आजार आहे. हा आजार मुख्यत्वे गोवर्गीय जनावरांमध्ये दिसतो. म्हैस, शेळी-मेंढी व इतर प्राण्यामध्ये हा आजार दिसत नाही. आढळत नाही. विषाणूवाहक डास, माश्या, गोचिड, चिलटे ई. कीटक तसेच बाधित जनावरांच्या संपर्कातील वस्तु, जखमा, नाकातील स्राव यामुळे आजाराचा प्रसार होतो. हा साथीचा आजार आहे. या आजारामुळे पायावर सूज येऊन जनावर लंगडते, ताप येऊन गेल्यानंतर संपूर्ण शरीरावर त्वचेखाली २ ते ५ सेंमी आकाराच्या गाठी येतात. आजाराच्या नियंत्रणासाठी गोवर्गीय वासरे, गाई, बैल यांचे प्रतिबंधात्मक लसीकरण करणे, तसेच बाधित जनावरावर पशुवैद्यकांच्या सल्ल्यानेच उपचार करणे आवश्यक ठरते.

### लक्षणे

- १०४ ते १०५ अंश फॅरानहाइटपर्यंत ताप येतो, पायावर सूज येऊन जनावर लंगडते, ताप येऊन गेल्यानंतर संपूर्ण शरीरावर त्वचेखाली २ ते ५ सेंमी आकाराच्या गाठी येतात.
- गळा व मागील पायाजवळील लसिका ग्रंथी सुजतात, हालचाल तसेच भूक मंदावते, दूध उत्पादनात घट येऊन नाक व डोळ्यावाटे स्राव गळतो.

### उपचार

आजाराची लक्षणे दाखवणारे जनावर दिसताच तत्काळ नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात संपर्क करावा. जनावराचे विलगीकरण करून त्वरित उपचार सुरू करावेत.

### प्रतिबंधात्मक उपाययोजना

- गोवर्गीय वासरे, गाई, बैल यांचे प्रतिबंधात्मक लसीकरण करावे.
- गोठा स्वच्छ ठेवावा, नियमितपणे गोठ्याचे निर्जंतुकीकरण करावे. त्यासाठी सोडियम हायपोक्लोराइड किंवा १ टक्का Formalin चे द्रावण वापरावे.
- डास, माशी व गोचिड इत्यादी रोगप्रसारक कीटकांचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी प्रतिबंधात्मक बाह्यपरोपजीविनाशकाची फवारणी करावी. यासाठी १ लिटर पाण्यात १० मिली करंज तेल, १० मिली कडुलिंब तेल, ४० ग्रॅम अंगाचा साबण एकत्र करून हे मिश्रण जनावरांच्या अंगावर आणि गोठ्यात ३ दिवसांच्या अंतराने तीन वेळा फवारणी करावी.
- निरोगी जनावरांना बाधित जनावरांपासून स्वतंत्र बांधावे. त्यांना पाणी व चारा स्वतंत्र द्यावे.
- परिसरातील रोगप्रादुर्भाव कमी होईपर्यंत नवीन जनावरांची खरेदी करू नये.

- जनावरांची अनावश्यक वाहतूक टाळावी. तसेच गोवर्गीय जनावरे पशु बाजार, यात्रा व इतर ठिकाणी एकत्रित येणार नाहीत याची काळजी घ्यावी.
- बाधित गोठ्यातील व्यक्तींना निरोगी गोठ्यात प्रवेश देताना त्यांनी आवश्यक निर्जंतुकीकरण केल्याची खात्री करावी. शक्यतो असे प्रवेश देणे टाळावे.
- लम्पी बाधित जनावरांची निगा राखणाऱ्या व्यक्तीने इतर पशुपालकांच्या, पशुधनाच्या संपर्कात येऊ नये.
- जनावरांना चरण्यास सोडू नये तसेच सामूहिक पाणी स्त्रोताच्या ठिकाणी पाणी पाजावयास नेऊ नये.
- निरोगी जनावरांमध्ये आजाराची लक्षणे दिसतात काय? याची नियमित पाहणी करावी.
- बाधित जनावरांच्या संपर्कातील निरोगी जनावरांना आयव्हरमेक्टिन इंजेक्शन दिल्यास प्रसार कमी होण्यास मदत होऊ शकते.
- कुठल्याही परिस्थितीत हा आजार लपवून ठेवू नये.

## लम्पी बाधित जनावरांचे व्यवस्थापन

- विषाणूजन्य आजार असल्याने खात्रीशीर उपचार उपलब्ध नाही. बाधित जनावरावर पशुवैद्यकांच्या सल्ल्यानेच उपचार करावा.
- बाधित जनावरांचे निरोगी जनावरांपासून विलगीकरण करावे. विलगीकरणात ऊन, वारा, पाऊस यापासून त्यांचे संरक्षण करावे.
- आजारी जनावरांची रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी समतोल आहार द्यावा. ज्यामध्ये हिरवी वैरण, पेंड, खनिज मिश्रणे, हर्बल लिव्हर टॉनिक, पचनक्रिया निरोगी ठेवण्यासाठी प्री आणि प्रो-जैविक औषधांचा समावेश करावा.
- मान आणि फऱ्यावर सूज असल्यामुळे जी जनावरे वैरण खात नाहीत, त्यांना हाताने वैरण खाऊ घालावी.
- तोंडावाटे औषधे पाजणे टाळावे. औषधे पाण्यामध्ये मिसळून द्यावे किंवा भरड्यामध्ये औषध कालवून त्याचे गोळे/लाडू करून जनावरांस खाऊ घालावेत.
- काही बाधित जनावरे पायावरील सुजेमुळे बसत नाहीत. अशा जनावरांना चटका बसणार नाही अशा मीठ घातलेल्या गरम पाण्याचा (हे मिश्रण तयार करताना मीठ गरम पाण्यामध्ये जोपर्यंत विरघळत राहते तोपर्यंत टाकावे) शेक कापडाने सुजेवर द्यावा. दिवसातून असे दोन वेळा सकाळ-संध्याकाळ करावे. सुजेची जागा पाण्याने पुसून कोरडे करूनच वरीलप्रमाणे शेक द्यावा.
- लम्पी आजाराच्या प्रादुर्भावामुळे जनावरांच्या अंगावर गाठी येतात.
- सूज शेकण्यासाठी मॅग्नेशिअम सल्फेटची बारीक केलेली पावडर आणि त्यामध्ये ग्लिसरीन मिसळून या मिश्रणाचा लेप सुजलेल्या जागेवर दोन वेळा लावावा. सूज दोन्ही पायांमध्ये असल्यास हा लेप लावल्यानंतर सुजेखालून कापड पाठीवर बांधावे.
- जनावरांच्या संपूर्ण अंगावर गाठी आहेत, त्यांचे अंग मिठाच्या द्रावणाने दिवसातून दोन वेळा पुसून घ्यावे.
- जनावरे बांधण्याची जागा कोरडी असावी. जी जनावरे उठत नाहीत त्यांच्या अंगाखाली पोते, वाळलेले गवत टाकावे, त्यांची बाजू बदलत राहावी जेणेकरून त्यांना जखमा होणार नाहीत. शक्य असल्यास उठण्यासाठी ॲनिमल लिफ्टरचा वापर करावा.
- अंगावरील जखमांना पशुवैद्यकाच्या सल्ल्याने रोज ड्रेसिंग करावे. अंगावर कापूर आणि खोबरेल तेल याचे मिश्रण करून ठीक-ठिकाणी कापसाने लावावे.
- तोंडातील तसेच कासेवरील जखमा पोटॅशिअम परमॅग्नेटच्या द्रावणाने धुऊन व त्यावर बोरोग्लिसरीन लावावे. लम्पीबाधित जनावरांच्या नाकामधून चिकट स्त्राव येतो. तो वाळून गेल्यावर श्वास घेण्यास त्रास होतो. अशा वेळी कोमट पाण्यात कापड ओले करून नाकपुडी पुसून स्वच्छ करावी. मान वर करून नाकामध्ये बोरोग्लिसरीन टाकावे. तसेच जास्त सर्दी असलेल्या जनावरांना निलगिरी तेल टाकून गरम पाण्याची वाफ द्यावी.
- आजाराच्या नियंत्रणासाठी ८० टक्के सेवा-शुश्रूषा आणि २० टक्के औषधोपचार हेच तत्व प्रभावी असल्याचे निरीक्षण माफसू विद्यापीठातील संशोधकांनी नोंदविले आहे. त्यामुळे उपचारासोबत उत्तम व्यवस्थापन, पौष्टिक आहार, जैव सुरक्षा उपाय योजना, बाह्यपरोपजीवी कीटकनाशक प्रतिबंध या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. बाधित गाभण गाईमध्ये गर्भपात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्यामुळे गाभण जनावरांची काळजी घ्यावी.
- बाधित गायींच्या वासरांना सडावाटे दूध पाजणे टाळावे. त्यांना दूध उकळून थंड करून / इतर निरोगी गाईचे दूध बाटलीने पाजावे.
- बाधित जनावरांच्या अंगावरील गाठी/जखमा, जखमांवरील खपल्या तसेच बाधित जनावरांच्या उपचारासाठी वापरलेले इतर जैविक साहित्य सर्व एकत्र करून जाळावे.
- आजारातून बरी झालेली जनावरे पशुवैद्यकांच्या सल्ल्याने पूर्ण खात्री करून निरोगी जनावरांमध्ये मिसळावीत.
- बाधित जनावरांना लसीकरण करू नये.
- लम्पी बाधित जनावरांचा मृत्यू झाल्यास शासकीय पशुवैद्यकांना याची माहिती देवून शव पाण्याच्या स्त्रोतापासून दूर आठ फूट खोल खड्डा खोदून त्यावर चुना टाकून पुरावे. तसेच मोकाट कुत्रे शव उकरणार नाहीत, याची काळजी घ्यावी.
- लम्पी त्वचा आजाराचा प्रसार होऊ नये, यासाठी जनावरे आणि गोठ्याची स्वच्छता नियमितपणे ठेवा.

# उत्तम प्रजनन... ५५ टक्के जुळी
# पश्चिम घाटासाठी वरदान झालवाडी शेळी





'शेळी ही गरीबाची गाय' असल्याची पारंपारिक संकल्पना आधुनिक काळात दुरुस्त करणे आवश्यक ठरणार आहे. कारण, सध्याच्या काळात शेळी ही गरीबाची गाय नसून, चांगले संगोपन केल्यास पशुपालकाला उत्तम आर्थिक नफा मिळवून देणारे शाश्वत उत्पन्नाचे साधन व अडचणीच्या काळात तात्काळ पैसे उपलब्ध करुन देणारे एटीएम असल्याचे वेळोवेळी सिद्ध झाले आहे. शेळीच्या दुधासह मांसाला असलेली मागणी दिवसेंदिवस वाढत असल्याने ग्रामीण भागात शेळीपालनाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. विशेषत: तरुण वर्गाची संख्या यामध्ये वाढू लागली आहे. अनेक उच्चविद्याविभूषित युवकांनीही लाखो रुपये पगाराच्या नोकऱ्या सोडून शेळीपालनाला प्राधान्य दिले आहे. उत्तर महाराष्ट्र सीमेवरील जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक, पालघर, ठाणे या पश्चिम घाटमाथ्यावरील जिल्ह्यांमध्येही शेळीपालकांची संख्या वाढू लागली आहे. याभागामध्ये झालवाडी शेळीचे संगोपन फायदेशीर ठरत असल्याने तरुण शेळीपालकांचा या शेळीच्या संगोपनाकडे ओढा वाढू लागला आहे.



डॉ. गिरीश पाटील
उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय,
जिल्हा धुळे

**झालवाडी शेळीचे मूळस्थान:**

झालवाडी या शेळीचे मूळस्थान गुजरात राज्यातील आहे. या राज्यातील रबारी व भरवाडी नावाचा स्थानिक मेंढपाळ समाज झालवाडी शेळीचे संगोपन करतो. गुजरातच्या सौराष्ट्र प्रदेशातील अर्धशुष्क भागात या शेळ्या आढळून येतात, जिथे पावसाचे प्रमाण कमी व अनियमित असते. गुजरात राज्यातील सुरेंद्रनगर व राजकोट जिल्ह्याचा काही भाग पुर्वी झालवाड यानावाने ओळखला जायचा. त्यावरुनच झालवाड असे नाव प्रचलित झाले असावे, असा संशोधकांचा अंदाज आहे. झालवाडी गुजरात राज्यातील...

शेळीची प्रजाती असली तरी महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर गुजरात राज्याला लागून असलेल्या जळगाव, धुळे, नंदुरबार, नाशिक, पालघर, ठाणे या जिल्ह्यात या शेळ्यांचे संगोपन अलिकडच्या काळात वाढू लागले आहे. यामध्ये तरुण शेळीपालकांचा सहभाग लक्षणीय आहे. चांगल्या उत्पादनक्षमतेमुळे या शेळीचे संगोपन करण्याकडे स्थानिकांचा कल वाढू लागला आहे.

महाराष्ट्र व गुजरात राज्याच्या सिमावर्ती भागात या शेळ्यांचे प्रमाण एकूण शेळ्यांच्या १० ते २० टक्क्यांपर्यंत आढळून आले आहे. या शेळ्यांच्या कळपाचा आकार १५ ते २०० पर्यंत असतो. ग्रामीण तसेच



दुर्गम आदिवासी भागात या शेळ्यांचे संगोपन मोकाट पद्धतीने करण्याकडे पशुपालकांचा कल असतो. मात्र, प्रगत तंत्रज्ञानाकडे तरुण पशुपालक आकर्षित झाला असल्याने त्याने उत्तम व्यवस्थापनातून या शेळ्यांमार्फत चांगले उत्पन्न घेण्यास सुरुवात केली आहे.

**शारीरिक वैशिष्ट्ये:**

ही शेळी मध्यम ते मोठ्या आकाराची असून, दुधासह चविष्ठ मांसासाठी उपयुक्त आहे. या शेळीचे पाय लांब असतात. रंग मुख्यतः काळा असून केस लांब, चमकदार व आकर्षक असतात. काही प्रजातींमध्ये काळ्या-पांढऱ्या रंगाचे मिश्रण असते. चेहरा थोडासा उंच असतो. नर व मादी दोघांनाही टोकदार वक्राकार शिंगे असतात, जी वर व मागे वळलेली असतात. कान लांब, पानांसारखे व झुलते असतात आणि नेहमीच पांढऱ्या ठिपक्यांनी भरलेले असतात. हे कान इतके रुंद व सैल असतात की, मेंढपाळ झाडाझुडपांमधून चरण्यास जाताना होणाऱ्या जखमा टाळण्यासाठी पारंपरिक पद्धतीने शेळ्यांचे कान कापतात. सरासरी शारीरिक लांबी, उंची व छातीचा घेर नरामध्ये अनुक्रमे ७६, ८३ व ७६ सेमी आणि मादीमध्ये ७२, ७८ व ७४ सेमी असतो.

**उत्पादनक्षमता:**


दोन आठवड्यांच्या अंतराने घेतलेल्या नोंदींनुसार, सरासरी दूध उत्पादन पहिल्या वेतामध्ये १.०९ लिटर व चौथ्या वेतामध्ये १.४२ लिटर आढळले असून, १२० दिवसांमध्ये सरासरी दूध उत्पादन १.२० लिटर असे राहिले आहे. प्रौढ नर व मादीचे सरासरी शरीर वजन अनुक्रमे ३८ व ३२ किलो असते. सरासरी रोजचे दूध उत्पादन १.७५ किलो असून, ते १.५ ते २.० किलो / दिवस इतके असते. काही शेळ्या गावपातळीवर १५० दिवसांच्या दुग्धोत्पादन कालावधीत १५४ किलो दूध देतात. प्रजननक्षमता चांगली असून ५५% जुळी व २% तिळी जन्म होतात. मूळ आढळस्थानात या जातीच्या शेळ्यांचे पहिल्या वेताचे वय २२ ते २३ महिने, दुधाचा कालावधी सहा ते ७ महिने, पुन्हा वेत घेण्याचा कालावधी ११ महिने व एकाहून अधिक पिल्ले होण्याचे प्रमाण ५७ टक्के आढळून आले आहे. महाराष्ट्रात या प्रजातीच्या शेळ्यांमध्ये हेच प्रमाण ५५ टक्क्यांपर्यंत पोहचले आहे. भविष्यात त्याची टक्केवारी वाढविण्यासाठी स्थानिक पशुप्रेमी संस्था व पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी कार्यरत आहेत.


धुळे येथील मालपूर येथे अण्णासाहेब शिंदे कृषी व सामाजिक विकास फाउंडेशनच्या संवर्धन व संशोधन प्रकल्पाच्या माध्यमातून झालवाडी शेळी प्रजातीच्या आनुवांशिक सुधारणेसाठी प्रयत्न केले जात आहे. यामध्ये पशुसंवर्धन विभागाची भुमिका व योगदानही महत्वपुर्ण आणि मार्गदर्शक ठरत आहे.



विभागाने मालपूर येथील प्रकल्प क्षेत्रातील सर्व झालवाडी शेळ्यांचे टॅगिंग पूर्ण केले असून, या शेळ्यांचे पशुसंवर्धन विभागाकडून नियमितपणे लसीकरणही करण्यात येत आहे. याशिवाय पशुउपचार शिबिरांच्या आयोजनातूनही या प्रजातीच्या संवर्धन व विकासाचे महत्व पशुपालकांमध्ये रुजविण्यात येत आहे. या कार्यात सदर फाउंडेशनच्या पशुवैद्यकीय कर्मचाऱ्यांचेही चांगले सहकार्य लाभत आहे. झालवाडी शेळीचे वैज्ञानिकदृष्ट्या, अनुवांशिकदृष्ट्या ...

अपग्रेडेशन करणे अत्यंत आवश्यक आहे आणि दृष्टीने दुधाच्या दैनंदिन नोंदी, तसेच प्रजननविषयक सर्व प्रकारच्या नोंदी घेऊन या शेळ्यांच्या अनुवांशिक सुधारणेसाठी पशुसंवर्धन विभाग सातत्यपूर्वक प्रयत्न करीत आहे. यामध्ये शेळीच्या दुधाच्या विक्रीसाठी शेतकऱ्यांना मदत आणि मार्गदर्शन करणे, शेळी मृत्युदर टाळण्यासाठी आरोग्य आधार प्रणाली, वेळेवर लसीकरण करून रोगमुक्त शेळ्यांसाठी जागरूकता निर्माण करणे, शेळ्यांमध्ये कृत्रिम रेतन आणि गर्भ हस्तांतरण (भ्रुण प्रत्यारोपण) आदींचा समावेश आहे.





अण्णासाहेब शिंदे प्रतिष्ठान, मालपूर, ता. शिंदखेडा जि. धुळे येथील झालवाडी शेळी संगोपन व संवर्धन प्रकल्प दरम्यान शेळीचे मुत्र संकलित करून त्याच्या डिस्टिलेशन प्लांटचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. गिरीश पाटील (जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय), डॉ. तुषार गिते (प्र. उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नंदुरबार ) आणि डॉ. संदिप निकम, (सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (प्र.) ) धुळे यांच्या उपस्थितीत करण्यात आला.



## झालवाडी नर व मादी शेळीचे शारीरिक आकारमान

| अ. क्र. | बाब | नर | मादी |
|---|---|---|---|
| १ | उंची (सरासरी सेंमी) | ८४.६१ | ७३.१६ |
| २ | शरीराची लांबी (सरासरी सेंमी) | ८१.०७ | ७३.०३ |
| ३ | हदयाची गती | ८६.११ | ७५.८९ |
| ४ | वजन (सरासरी किलो) | ३८.८ | ३३ |
| ५ | जन्मत: वजन (सरासरी किलो) | ३.०८ | २.८४ |



# धोक्यांची बेरीज...जीवघेणा रेबीज

काही दिवसांपूर्वीच घडलेली घटना आपणा सर्वांना आठवतच असेल. कबड्डीच्या एका राष्ट्रीय स्तरावरच्या खेळाडूने पाण्यात डुबणाऱ्या एका कुत्र्याच्या पिल्लाला वाचवले. या दरम्यान पिल्लाचा दात त्या खेळाडूच्या बोटाला लागला. किरकोळ खरचटल्यामुळे, जसे बहुतांश करतात तसे त्याने सुद्धा त्या गोष्टीकडे दुर्लक्ष केले. काही दिवसांनंतर त्याला जिथे खरचटले होते त्या ठिकाणी झिणझिण्या जाणवू लागल्या, त्यानंतर बधीरपणा आणि त्यानंतर घशात अडथळा निर्माण होऊ लागला. पाणी किंवा कुठलेही प्येय पिल्यास गळा पूर्णपणे बंद होऊ लागला आणि नंतर अंगात लकवा येऊ लागला. शेवटी त्याचा मृत्यू झाला.

ही एक क्लासिकल रेबीजची केस होती. तुम्ही रेबीजचे नाव तर नक्कीच ऐकले असणार. हा एक गंभीर आजार आहे जो उष्ण रक्त असलेल्या प्राण्यांनी (कुत्रा, मांजर, कोल्हा, लांडगा, वटवाघुळ इ.) चावल्यामुळे होतो आणि हा आजार झाल्यावर मृत्यूची संभावना जवळपास १००% आहे. भारतात दरवर्षी एक करोड ७० लाख लोकांना प्राणी चावतात आणि जवळपास १८ ते २० हजार लोकांना रेबीज होऊन त्यांचा मृत्यू होतो. यामध्ये सगळ्यात दु:खद गोष्ट म्हणजे हे मृत्यू पूर्णपणे टाळता येऊ शकतात, पण प्रतिबंधात्मक उपायांअभावी ते टाळले नाही जात.

संकलन: सहायक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय, औंध, पुणे-६७

## रेबीज काय आहे?

रेबीज हा एक विषाणूजन्य सांसर्गिक रोग आहे जो Lyssavirus नावाच्या विषाणूमुळे होतो. हा विषाणू संक्रमित प्राण्याच्या लाळेत असतो. विशेषतः कुत्रा जर चावला किंवा खरचटलं तरी, त्याच्या लाळेतील विषाणू माणसांच्या शरीरात प्रवेश करतात. जर वेळेवरच योग्य उपचार नाही केला, तर हे विषाणू माणसाच्या / बाधित सजीवाच्या मृत्यूचे कारण बनतात. भारतामध्ये ९५ टक्के घटना संक्रमित कुत्रे चावल्यामुळे होतात.

संक्रमित प्राणी चावल्यानंतर जेव्हा आपल्या शरीरात विषाणू प्रवेश करतो तेव्हा तो रक्तात न मिसळता मज्जातंतूद्वारे मेंदूपर्यंत पोहोचतो. चावलेल्या भागापासून ते केंद्रीय मज्जासंस्थेपर्यंत पोहोचण्याची गती फार कमी असते व जर पायाला / हाताला चावला असेल तर मेंदूपर्यंत पोहोचायला साधारणतः २० पेक्षा जास्त दिवस लागतात. पीडित व्यक्ती एक बाळ असेल किंवा चेहऱ्यावर, मानेवर चावले असेल तर साधारणत: चार ते सात दिवसात हा विषाणू मेंदूपर्यंत पोहोचतो. साधारणत: चावल्यानंतर मेंदूपर्यंत पोहोचल्यावर रेबीज व्हायला एक ते तीन महिने लागतात. काही अपवादात्मक प्रकरणामध्ये एक वर्ष सुद्धा लागू शकते. कुठे चावले आहे (चेहरा की हातपाय), किती मोठी जखम आहे, किती वायरस आत गेला आहे आणि व्यक्तीची रोग प्रतिरोधक क्षमता किती आहे, या सगळ्यांवर ते अवलंबून असतं.

📌 **रेबीजची लक्षणे काय आहेत?**

सुरुवातीला ताप, थकवा, चावलेल्या जागी जळजळ, झिणझिण्या, खाज इत्यादी. नंतर रेबीज उग्र रूप घेतो आणि त्यात पाण्याची भीती, हवेची भीती, प्रकाशाची भीती, घाबरणे, आरडाओरड करणे, अति लाळ सुटणे इत्यादी. शेवटी स्नायूंमध्ये कमजोरी, अंगात लकवा आणि मृत्यू इ.

📌 **रेबीज चा उपचार काय?**

ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे जी आपल्या सर्वांना माहीत असणे आवश्यक आहे. जर तुम्हाला कुठल्या कुत्र्याने किंवा कुठल्या प्राण्याने चावले आहे तर सगळ्यात आधी जखमेचा भाग वाहत्या पाण्याखाली धरून पाणी आणि साबणाने पंधरा ते वीस मिनिट धुणे. किमान पंधरा मिनिटं. हे करताना बराच विषाणू बाहेर निघतो. हे करणे अत्यावश्यक आहे याला दुर्लक्ष करू नये. त्यानंतर जखमेत अँटीसेप्टिक (उदा. povidone iodine) लावावी.

जखमेवर पट्टी बांधून त्याला झाकू नये. जखमेला उघडं ठेवा. जर खूप मोठी जखम असेल तर आरोग्य कर्मचारी हलके टाके लावू शकतो. जखमेला जाळू नका. जखमेवर कोणतेही घरेलू उपचार करू नका (उदा. त्यावर मिरची लावणे) यामुळे नुकसान होईल. टेटनसचं इंजेक्शन आणि डॉक्टरांनी सांगितलेली अँटीबायोटिक्स जरूर घ्या.

आता PEP - Post-Exposure Prophylaxis बद्दल जाणून घेऊया, विषाणूच्या संपर्कात आल्यानंतर दिला जाणारा बचाव. लसीच्या माध्यमातून बचाव करण्यायोग्य रोगांसाठी लस त्या रोगाच्या संपर्कात येण्याआधी दिली जाते जेणेकरून आपले शरीर आधीच त्या रोगाविरुद्ध अँटीबॉडीज तयार करेल. पण रेबीजमध्ये आपण ही लस विषाणू संपर्कात आल्यानंतर देतो.

का? कारण या केसमध्ये संपर्कात येणारा विषाणू आणि त्यानंतर रोगाची सुरुवात होण्यामध्ये एक फार मोठा कालावधी असतो. यादरम्यान लसीचा कोर्स पूर्ण करून आपण या रोगाचा धोका जवळपास ९९.९% पर्यंत कमी करू शकतो. कोणत्याही प्राण्याच्या चाव्यामुळे झालेल्या जखमांसाठी जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) तीन प्रकारचे एक्सपोजर कॅटेगिरीज ठरवले आहेत.



📌 **लस कशी दिली जाते?**

लस आपण IM म्हणजेच खांद्यावरील डेल्टॉइड स्नायूमध्ये देऊ शकतो किंवा ID म्हणजेच त्वचेच्या थरांमध्ये देऊ शकतो. लक्षात ठेवा की ज्या पद्धतीने पहिला डोस दिला आहे, त्याच पद्धतीने पुढील सर्व डोसही दिल्या जावेत. ज्या ब्रँडची / प्रकारची लस पहिल्या डोसमध्ये दिली आहे, त्याच लसीने संपूर्ण कोर्स पूर्ण केला पाहिजे. समजा आपण आज म्हणजेच ०४.०७.२०२५ रोजी पहिला डोस स्नायूंमध्ये घेतला, तर आपले वेळापत्रक खालीलप्रमाणे बनेल

**Day ०:** पहिला डोस ०४.०७.२०२५

**Day ३:** दुसरा डोस ०७.०७.२०२५

**Day ७:** तीसरा dos ११.०७.२०२५

**Day १४:** चौथा डोस १८.०७.२०२५

**Day २८:** पाचवा डोस ०१.०८.२०२५

जर आपण आयडी म्हणजेच त्वचेच्या थरांमध्ये डोस घेतला असेल तर आपले वेळापत्रक पुढील पृष्ठावर दर्शविल्याप्रमाणे बनेल.

**CATEGORY 1** — यामध्ये प्राण्याने फक्त स्पर्श केलेला असतो किंवा चाटले असते. त्वचेवर कुठलीही जखम नसते. यावेळेस कुठल्याही उपचार किंवा लसीकरणाची आवश्यकता नसते.

**CATEGORY 2** — यामध्ये खरचटले आहे पण रक्त निघालेलं नाही. यावेळेस लसीकरणाचा पूर्ण कोर्स आवश्यक आहे.

**CATEGORY 3** — यामध्ये प्राण्याने चावले आहे, रक्तसुद्धा निघाले आहे आणि जखमही आहे. यामध्ये लसीकरणाच्या पूर्ण कोर्ससोबतच RIG (Rabies Immunoglobulin) जखमेच्या आत टोचणे आवश्यक आहे.

जर आपण आयडी म्हणजेच त्वचेच्या थरांमध्ये डोस घेतला असेल तर आपले वेळापत्रक पुढीलप्रमाणे बनेल.

Day ०: पहिला डोस ०४.०७.२०२५

Day ३: दुसरा डोस ०७.०७.२०२५

Day ७: तिसरा डोस ११.०७.२०२५

Day २८: चौथा डोस ०१.०८.२०२५

म्हणजे ID वेळापत्रकानुसार फक्त चारच डोस घ्यावे लागतील.

हे वेळापत्रक Category II आणि Category III जखमांसाठी आहे. तसेच Category III जखमांसाठी **RIG** (Rabies Immunoglobulin) हे इंजेक्शनद्वारे जखमेत आणि जखमेच्या आजूबाजूच्या भागात दिले जाते. जर तुम्ही प्राण्याच्या चाव्यांनंतर वरील सर्व प्रक्रिया पाळत डॉक्टर किंवा आरोग्य केंद्रातून योग्य आणि वेळेवर पूर्ण लसीकरण व **RIG** घेतले, तर रेबीज होण्याची शक्यता जवळपास शून्य होते.

लक्षात ठेवा, चाव्यांनंतर लगेच जखम वाहत्या पाण्याखाली साबण व पाण्याने स्वच्छ धुवून शक्य तितक्या लवकर लसीकरण सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे.



**📌आता काही चुकीच्या समजुतींबद्दल बोलूया:**

**चुकीची समजूत:** जर रक्त बाहेर आलं नाही, तर काही धोका नाही.

**सत्य:** खरवड (स्क्रॅच) झाल्यासही जर लाळेचा संपर्क झाला असेल तर विषाणू पसरू शकतो. जर पंजा मारला असेल तर काही होणार नाही, पण जर दात लागले असतील, तर मग रक्त आलं असो वा नसो, लस नक्की घ्या. जर शंका असेल की दात लागले की फक्त पंजा, तर दात लागले समजून लस घ्या आणि जर पंजा मारताना लाळेचा संपर्क झाला असेल तरीही लस घ्या.

**चुकीची समजूत:** पाळीव कुत्र्याने चावल्यास काही होत नाही.

**सत्य:** पाळीव प्राण्याच्या चाव्यांनंतरही रेबीजचे काही केसेस आढळले आहेत. त्यामुळे प्रत्येक चाव्याला गंभीरपणे घ्या.

**चुकीची समजूत:** झाडफूंक किंवा देशी इलाजांनी रेबीज बरा होतो.

**सत्य:** रेबीजचे लक्षण एकदा दिसू लागल्यावर त्यावर कुठलाही उपचार शक्य नाही.

**चुकीची समजूत:** रेबीजची लस घेतल्याने कमजोरी येते किंवा गंभीर साइड इफेक्ट होतात.

**सत्य:** अँटी-रेबीज लस पूर्णपणे सुरक्षित आहे. हे मृत्यू आणि जीवनाच्या दरम्यानचं एकमेव संरक्षण आहे.

**एक गोष्ट अजून लक्षात ठेवा:**

WHO आणि भारत सरकारच्या राष्ट्रीय रेबीज नियंत्रण मार्गदर्शिकेनुसार, जर चावणारा किंवा खरवडणारा प्राणी पाळीव, लस दिलेला, १० दिवसांनंतरही जिवंत आणि निरोगी दिसत असेल, तर Post-Exposure Prophylaxis (PEP) म्हणजेच लस घेण्याची गरज नाही, पण त्यासाठी १० दिवस थांबू नका.

- पहिल्याच दिवशी लसीकरण आणि गरज असेल तर RIG सुरू करा. ०, ३ आणि ७ व्या दिवशीच्या तीन डोसेस घ्या. जर १४ वा किंवा २८ वा दिवस येईपर्यंत प्राणी जिवंत आणि निरोगी असेल, तर पुढील डोस बंद करू शकता.
- RIG म्हणजेच immunoglobulin ही फक्त एकदाच, पहिल्या डोस (day ०) च्या वेळी दिली जाते. जर त्यावेळी उपलब्ध नसेल, तर ७ दिवसांच्या आत ती दिली जाऊ शकते.
- ७ दिवसांनंतर ती देण्याची गरज नाही.लक्षात ठेवा की रेबीज हा १००% जीवघेणा रोग आहे, पण त्याचा १००% प्रतिबंध शक्य आहे. कसलाही निष्काळजीपणा प्राणघातक ठरू शकतो.





# चारा लागवडीतून दररोज ४ ते ५ हजार रुपयांची कमाई

रामटेक तालुका म्हणजे नागपूर जिल्ह्यातील पवित्र व निसर्गरम्य परिसर. रामाने वनवासकाळात या टेकडीवर काही काळ विश्रांती घेतली, म्हणून यास रामटेक नाव पडल्याची आख्यायिका आहे. याच तालुक्यातील भीलेवाडा येथील प्रगतीशील पशुपालक शेतकरी श्री. प्रवेश खडसे यांनी आपल्या गावातच चारा निर्मिती व विक्रीचा स्वयंरोजगार करुन दररोज चार ते पाच हजार रुपयांचे उत्पन्न मिळविण्याची किमया साधली आहे. त्याच्या या यशोगाथेविषयी...

भीलेवाडा येथील शेतकरी श्री. प्रवेश खडसे हे सुरुवातीला आपल्या वडिलोपार्जित शेतीमध्ये भाजीपाल्याची लागवड करुन उदरनिर्वाह साधत असत. या भागात दुग्धव्यवसायाचे प्रमाण प्रारंभी मर्यादीत होते. मात्र, विदर्भ-मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पातंर्गत स्थानिक स्तरावर दुग्धव्यवसाय करणाऱ्या पशुपालकांची संख्या वाढू लागली. त्यामुळे चाऱ्याला मागणी वाढू लागली.

भीलेवाडा भागामध्ये दुग्धव्यवसायाचे वाढते प्रमाण लक्षात घेता श्री. प्रवेश खडसे यांना चारा विक्रीचा व्यवसाय करण्यासाठी पशुधन विकास अधिकारी डॉ. विनोद समर्थ यांनी मार्गदर्शन केले. त्यानुसार त्यांनी विदर्भ-मराठवाडा दुग्ध विकास प्रकल्पातंर्गत संकरीत नेपियरचे ठोंबे उपलब्ध करुन देण्याबाबत पशुसंवर्धन विभागाकडे अर्ज केला. त्यानुसार पशुसंवर्धन विभागातील अधिकाऱ्यांनी श्री. खडसे यांना ठोंबे उपलब्ध करुन दिली. या ठोबांची लागवड श्री. खडसे यांनी आपल्या शेतीत केली. त्यानंतर स्थानिक शेतकऱ्यांकडून ठोंबांची मागणी श्री. खडसे यांच्याकडे होऊ लागली. त्यानुसार खडसे यांनी ठोबांची विक्री सुरु केली. पंचक्रोशीतील शेतकऱ्यांकडून चाऱ्याची मागणी वाढू लागल्याने श्री. खडसे यांनी आपल्या शेतामध्ये आणखी सहा ते सात एकरावर नेपियरची लागवड केली. शेतातील चाऱ्याची कुट्टी तयार करुन त्यांनी दुग्धव्यावसायिकांना विक्री करण्यास सुरुवात केली. सद्यस्थितीत दररोज हजार ते पंधराशे किलो चाऱ्याची कुट्टी ते विक्री करतात. त्यातून त्यांना चार ते पाच हजार रुपयांची आवक होते.

याशिवाय, श्री. खडसे यांनी मुक्तसंचार गोठ्याच्या माध्यमातून गोपालनही सुरु केले आहे. त्यातून दररोज शंभर लिटर दूध उत्पादीत होते. दुग्धव्यवसाय व चारा विक्रीच्या माध्यमातून श्री. खडसे महिन्याकाठी लाखो रुपयांचे उत्पन्न मिळवत आहे. इच्छुक गोपालकांना मार्गदर्शनसुद्धा ते करत असून, त्यामुळे इतर गोपालकांचेसुद्धा आर्थिक उत्पन्न वाढत आहे.

> चारा विक्रीतून व दुग्धव्यवसायातून मला अपेक्षित उत्पन्न मिळत असल्याने मी भाजीपाला उत्पादने सध्या घेत नाही. दुग्धव्यवसाय व चारा विक्री मला हमखास उत्पन्न देणारे साधन ठरले आहेत. यासाठी पशुसंवर्धन विभागाचे आभार.
>
> **प्रवेश खडसे,** अनुसया डेअरी फार्म
>
> भ्रमणध्वनी: ९८३४०३८२९३





आर्थिक अडचणींच्या काळात पैसा उपलब्ध करुन देण्याची क्षमता पशुसंवर्धनाच्या व्यवसायात आहे. शाश्वत उत्पन्न देणारा हा व्यवसाय शेतकरी-पशुपालकांचे 'एटीएम मानला' जातो. परसातील कुक्कुटपालनातून पैशांसोबतच चिकन व अंडी यासारखा पोषक आणि संतुलित आहार उपलब्ध होत असतो. त्यामुळेच कोंबडीला 'परसातील लक्ष्मी' असेही संबोधले जाते. कौटुंबिक विकासात महत्वाची भागिदारी ठेवणाऱ्या व ग्रामीण अर्थकारणाला चालना देणाऱ्या या स्वयंरोजगाराच्या संकल्पनेला चित्ररुप देण्याचा प्रयत्न केला आहे,
**डॉ. प्रशांत भड (उपआयुक्त पशुसंवर्धन तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरण)** यांनी.



# गुळ पेढा निर्मिती तंत्रज्ञान व पद्धती

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपुर द्वारा

पेढा हा भारतीय मिठाईचा एक असा प्रकार आहे,जो केवळ चवीलाच नव्हे तर भारताच्या सांस्कृतिक वैविध्यालादेखील अधोरेखित करतो. प्रत्येक प्रांतात पेढा बनवण्याची पद्धत, त्यात वापरलेले घटक आणि स्थानिक परंपरांच्या छटा दिसून येतात. उदा. मथुरेचा प्रसिद्ध पेढा, धारवाड पेढा. या विविधतेमुळे प्रत्येक पेढ्याला एक विशिष्ट ओळख आणि तो आपल्या प्रांताच्या सांस्कृतिक परंपरेचे प्रतिनिधित्व करतो. पेढ्याची निर्मिती ही एक कला आहे जिथे तापमान, वेळ आणि साहित्य यांचा अचूक मेळ साधला जातो. स्थानिक घटकांच्या वापरामुळे पेढ्याचे संवेदी आणि रासायनिक गुणधर्म बदलतात, ज्यामुळे प्रत्येक प्रांतात तयार होणारा पेढा हा चवीला आणि स्वरूपाला एकदम वेगळा असतो. या प्रक्रियेत वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या समावेशाने, पेढ्याच्या टिकवण क्षमतेमध्ये सुधारणा करता येते, तसेच त्याच्या उत्पादनाची गुणवत्ता आणि प्रमाण देखील वाढवता येते. परिणामी, पेढ्याचे तंत्रज्ञान हे केवळ परंपरा टिकवून ठेवणारे नाही तर आधुनिकतेच्या दृष्टीनेही प्रगत आहे. त्यामुळे, पेढा ही मिठाई केवळ गोड पदार्थ म्हणून नव्हे, तर परंपरा, सांस्कृतिक वारसा, व आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम म्हणूनही महत्वाची ठरते.

भारताची मिठाई उद्योगाची बाजारपेठ पेढा आणि दुधापासून बनवलेले इतर गोड पदार्थ भारताच्या सर्व भागात वर्षभर वापरले जातात. भारतीय बाजारपेठेत पेढा या डबाबंद (पॅकेज्ड) मिठाई उत्पादनाची मागणी कधीही संपत नाही. सण आणि उत्सव प्रसंगी या उत्पादनाला शहरी तसेच ग्रामीण भागातही फार मागणी असते. विविध धार्मिक कार्यक्रमात प्रसाद म्हणून पेढ्याचे वितरण केले जाते.ई.स.२०२३ मध्ये भारतातील पॅकेज्ड मिठाई बाजाराचा आकार ६२२९.७ कोटीं रुपये पर्यंत पोहोचला आहे. २०२३-२०३२ दरम्यान पॅकेज्ड मिठाई बाजार१६.६७% दराने वाढून २०३२ पर्यंत २५,९७०.८ कोटी रुपये पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. वाढती कार्यरत लोकसंख्या, रेडी-टू-सर्व्ह प्रकारांकडे ग्राहकांची पसंती वळणे, ऑनलाइन आणि ऑफलाइन वितरण चॅनेलद्वारे पॅक केलेल्या मिठाईची सहज उपलब्धता हे बाजाराला चालना देणारे काही प्रमुख घटक आहेत.



### पेढा बनविण्यासाठी लागणारी सामुग्री

सामान्यतः साखर, खवा किंवा मावा यांचे मिश्रण तयार करून पेढा तयार केला जातो. स्वाद वाढविण्यासाठी पेढ्यामध्ये वेलची पूड, पिस्ता व केशर इत्यादींचा वापर केला जातो. उत्तम गुणवत्तेचा पेढा बनविण्यासाठी मुख्यतः धाप खोव्याचा वापर केला जातो.

### पेढ्यात साखरेऐवजी गुळाचा वापर :

पेढ्यात साखरे ऐवजी गुळाचा वापर केल्याने पेढ्याचा स्वाद आणि पौष्टिकता दोन्ही वाढू शकते. गुळामुळे पेढ्याला एक वेगळा, हलका गोडवा आणि सुंदर तपकिरी रंग येतो. सध्या सर्वजण आरोग्याप्रती दक्ष झालेले आहेत त्यामुळे गोडाचा मुख्य स्रोत म्हणून साखरे ऐवजी गुळ वापरण्याकडे कल वाढला आहे. पेढ्याला गोडवा व स्वाद देण्यासाठी साखर वापरली जाते, परंतु साखरेचे काही दुष्परिणाम देखील आहेत. साखर हा उच्च कॅलरी स्रोत आहे त्यामुळे वजन वाढते तसेच मधुमेहाचा धोका वाढतो. गुळाच्या वापरामुळे पेढा केवळ चविष्टच होत नाही, तर तो शरीराला उर्जा देणारा आणि पचनास सोपा असतो. गुळ हा भारतीय उपखंडातील एक प्रमुख गोड पदार्थ आहे, जो मुख्यतः ऊसाच्या रसापासून बनविला जातो. गुळाचा वापर भारतीय संस्कृतीत फार प्राचीन काळा पासून होत आहे. गुळाचा उपयोग केवळ गोड पदार्थ म्हणूनच नव्हे तर आयुर्वेदात औषध म्हणूनही केला जातो.

## दुग्धपदार्थ निर्मिती : एक व्यावसायीक दृष्टीकोन

दुग्ध उद्योगाची वाढ करण्यासाठी सर्व डेअरीज मुल्यवर्धित दुग्ध पदार्थाकडे लक्ष केंद्रित करत आहेत. या पदार्थांपासून होणाऱ्या उत्पादनामुळे दुग्ध प्रक्रिया उद्योगाची लक्षणीय वाढ झाली असल्याचे दिसून येते. विकासाला चालना देण्यासाठी बहुतेक कंपन्यांनी या विभागावर लक्ष केंद्रित करण्याचे ठरविले आहे. दुग्ध उत्पादनातील प्रचंड वाढ, लोकसंख्येतील बदल, लोकांच्या राहणीमानात सुधारणा व शहरीकरण यामुळे ग्राहकांचा कल मुल्यवर्धीत दुग्ध पदार्थाकडे वाढला आहे. दूध क्षेत्रातील हा बदल उत्पादकास फायदेशीर सिध्द झाला आहे. मुल्यवर्धित दुग्ध पदार्थावरील नफा हा निव्वळ दूध विक्रीपेक्षा अधिक आहे. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन लघु दूध प्रक्रिया उद्योग स्थापित करुन आपल्या गावातील तसेच किंवा नजिकच्या गावांतील दूध एकत्र करुन त्यावर प्रक्रिया करुन मुल्यवर्धन करुन विक्री व मुल्यवर्धीत दुग्ध पदार्थ निर्मिती केल्यास त्यांच्या उत्पन्नात नक्कीच वृध्दी होईल.





## गुळपेढा बनविण्याची पद्धत

साधारणतः ३:१ च्या प्रमाणात खवा आणि साखर मिसळून पेढा तयार केला जातो. परंतु उत्तम प्रकारचा गुळ पेढा बनविण्यासाठी धाप खवा आणि गुळाचे प्रमाण ५:१ असे वापरतात.

- प्रथमतः, धाप खवा आणि गुळ यांचे मिश्रण हलक्या आगीवर गरम केले जाते, मिश्रण तुलनेने मजबूत पोत येईपर्यंत ढवळले जाते.
- तदनंतर स्वादासाठी आवडीनुसार वेलची पूड, पिस्ता व केशर इत्यादीं पदार्थ मिसळली जातात.
- मिश्रण थंड झाल्यावर त्याचे छोटे १५-२५ ग्रॅम आकाराचे गोळे बनवले जातात आणि त्यांना पेढ्याचा आकार दिला जातो.
- पेढ्याच्या गोळा /चकतीला वैविध्य पूर्ण आकार देण्यासाठी विशिष्ट डाय आणि मोल्डचा वापर केला जाऊ शकतो.




### गुळ पेढ्याचे पोषण लाभ

गुळ व दुध दोन्ही कर्बोदकांचे चांगले स्रोत आहेत, त्यांच्या सेवनाने शरीराला त्वरित उर्जा मिळते. गुळामध्ये नैसर्गिकरित्या लोह, कॅल्शियम, पोटॅशियम आणि मॅग्नेशियम यांसारखी आवश्यक खनिजे आढळतात, जे शरीरासाठी अत्यंत फायदेशीर असतात. गुळातील लोहाच्या उच्च प्रमाणामुळे रक्तातील हिमोग्लोबिन वाढून ॲनिमियावर नियंत्रण आणता येते. दुधातील जीवनसत्वे अ, ब १, ब १२ व जिवनसत्व ड शरीराच्या विविध कार्यासाठी उपयुक्त असतात. गुळातील ॲंटीऑक्सिडंटस व सेलेनियम शरीराची रोग प्रतिकार शक्ती वाढवतात. मधुमेह असणाऱ्या व्यक्ती सुद्धा गुळ पेढ्याचा काही प्रमाणात स्वाद घेऊ शकतात. त्यामुळे गुळ घालून बनविलेला पेढा आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे.





**डॉ. सुनील देशपांडे**
पशुधन विकास अधिकारी
पशुवैद्यकीय दवाखाना (श्रेणी १)
कुडाळ तालुका जावळी
जिल्हा सातारा
**संपर्क:** ९४२३८६५४५८




# कहाणी लंपी चर्मरोगाची (भाग १)

**रखमा:** अक्कासाब, वो sss अक्कासाब sss

**अक्कासाहेब:** रखमा, अगं काय ग? का हाक मारलीस ?

**रखमा:** आवोSSS माझी कपीली गाय नव्हं का ?

**अक्कासाहेब:** हम्म, काय झालं कपिलेला ?

**रखमा:** आवो SS काय सांगू? आवो, आज रानातून चरून आल्यापासून कपिलेला वैरण टाकली. ती ढूंकून बी बघंना तिच्याकडं. आन् पानी बी नको म्हंतीया. आता माझं काय डोस्कंच चालंना बगा. म्हणून तुम्हास्नी हाळी दिली बगा.

**अक्कासाहेब:** अस्सं होय ? बघू बरं¤ चल बरं गोठ्यात...

**रखमा:** या की अक्कासाब. थांबा हां. लाईट लावते हितला.... हं. हे बघा अक्कासाब. आमच्या कपीलेची तऱ्हा. रुसून बसल्यावाणी खाईना बघा. वैरण टाकली, कडबा टाकला, कुट्टी दिली, रतीब ठेवला. कश्शाला बी तोंड लावीना...

**अक्कासाहेब:** खरंच की रखमा...अगं आणि हे दोन चार फोडसुद्धा दिसतायत की ग अंगावर. ताप असेल कदाचित!

**रखमा:** व्हयं, अक्कासाब. तसंबी असंल.

**अक्कासाहेब:** रखमा, मी काय म्हणते ?

**रखमा:** काय वं अक्कासाब?

**अक्कासाहेब:** अग, आत्ता आपल्या आळीतच डॉक्टरसाहेब आलेले पाहिले मी. त्या दोन घर पलीकडच्या घरात.. म्हशीला सिमेंस करायला....आपण बोलवूया का त्यांना?

**रखमा:** चालतंय की अक्कासाब. घ्या बेगीनं बोलवून.

**अक्कासाहेब:** मी बोलावते हे. अगं ते बघ तिकडूनच चाललेत ! आलेच! डॉक्टर साहेब sss ओ डॉक्टरसाहेबsss ईथे इकडे जरा यायचं होत रखमाच्या घरी!

**डॉक्टर:** हां. नमस्कार अक्कासाहेब. नमस्कार रखमाताई !

**अक्कासाहेब:** नमस्कार डॉक्टरसाहेब..

**रखमा:** नमस्कार डाक्टरसायेब. अगदी देवावानी आलात बगा धावून !

**डॉक्टर:** का हो? काय झाले काय?

**अक्कासाहेब:** अहो, डॉक्टरसाहेब, ही रखमाची कपिला गाय. संध्याकाळी रानातून चरुन आणल्यापासून खात नाही, पाणी सुद्धा पित नाही...आणि अंगावर दोन-चार फोड आलेले दिसत आहेत.

**डॉक्टर:** अच्छा अच्छा. बघू बरं. थोडे धरा तीला. मी ताप पाहतो. हमम...अंग गरम लागतंय. ताप आहे बरं कपिलेला. आणि हे फोड म्हणजे लंपी आजाराची सुरुवात असणार असं दिसतंय!

**रखमा:** लंपी. आत्ता ग बाई !

**अक्कासाहेब:** अरे देवा !!

**डॉक्टर:** अहो, इतकं घाबरून जाऊ नका. लंपीवर थेट उपाय नसला तरी कपिलेला या आजारातून बाहेर काढण्याचा प्रयत्न करू या आपण.

**अक्कासाहेब:** हो! डॉक्टरसाहेब, प्लीज तेवढे कपीलेला बरे करा हो. लंपी फार भयानक आजार असतो म्हणे !

**रखमा:** व्हय डॉक्टरसाहेब ! मी बी थोडंफार ऐकून हाय! मला लयी भ्या वाटाया लागलंय बगा¤ काय बी करुन माझ्या कपिलीला बरी करा हो!

**डॉक्टर:** हो! हो! अक्कासाहेब, रखमाताई, नका काळजी करु. करू आपण प्रयत्न. आधी उपचार करतो आणि मग तुम्हाला सगळे नीट समजावून सांगतो.

**रखमा:** व्हय-हय. आगोदर उपचार करा. डॉक्टरसाहेब. मग नीट बायजवार आमाला सांगा समदं.

**डॉक्टर:** हो. हो. चला थोडं पाणी गरम करा.

**रखमा:** व्हय व्हय. आत्ता करती बगा.

(डॉक्टर व्यवस्थित उपचार करतात. त्यानंतर...)

**अक्कासाहेब:** हं. बसा डॉक्टरसाहेब.

**रखमा:** डॉक्टरसायेब, काही भिण्याजोगं न्हायी न्हवं?

**डॉक्टर:** हं. भिण्यासारखं नाही. पण पुढील काही दिवस उपचार करावे लागतील. होईल कपिला ठीक. काळजी करू नका.

**रखमा:** आता कसं बरं वाटलं बगा तुमचं बोलणं ऐकून ! डॉक्टरसाहेब, कपिलेला लंपी झाला असेल का?

**डॉक्टर:** होय रखमाताई, लक्षणं तरी तशीच दिसतायत...

**अक्कासाहेब:** डॉक्टरसाहेब, हा लंपी म्हणजे नक्की आहे तरी काय? लहानपणापासून या आजाराबद्दल कधी ऐकले नव्हतं पण या २-३ वर्षात पशुपालकांनी चांगलीच धास्ती घेतलीय या लंपीची.

**डॉक्टर:** खरंय, अक्कासाहेब. लंपी त्वचारोग हा खरं तर तसा जुनाच आजार आहे. गाई-हशींमधे होणारा. आफ्रिका आणि इतर काही खंडांत तो बराच वर्षे आहे. पण आपल्या देशात तो तीनचार वर्षे झाली म्हणजे साधारणतः २०१९ नंतर जास्त प्रमाणात दिसून येऊ लागला आहे.

**रखमा:** म्हंजी माणसास्नी तवा करोना आला अन् जित्राबास्नी लंपी! संकटं छप्पर फाडून येत्याती ह्याचं खरं! डॉक्टरसाहेब, नेमकं हाय काय हे लंपीचं इंगीत?

**डॉक्टर:** लंपीचर्मरोग/त्वचारोग हा आजार विषाणूमुळे होतो.



कॅप्रीपॉक्स नावाच्या विषाणूमुळे हा होतो. विषाणू म्हणजे अगदी उघड्या डोळ्यांना न दिसणारा पण सूक्ष्मदर्शक यंत्रांखाली दिसू शकणारा अगदी लहानगा जंतू. पण हा एवढासा जंतू किती गोंधळ घालतो पहा!

**अक्कासाहेब:** खरंच की. सामान्य शेतकऱ्याला लंपीचं नाव काढलं की धडकी भरते!

**रखमा:** अवं, व्हय तर डॉक्टरसायब! अक्कासाब म्हंत्यात त्ये अगदी खरं हाय बघा!

**डॉक्टर:** हम्म. शेळ्यांमधे गोट पॉक्स (शेळ्यांमधील देवी) आणि मेंढ्यांच्यामध्ये शिप पॉक्स (मेंढयातील देवी) हे विषाणू असतात, त्याच कुंटुंबातला हा विषाणू असतो.

**रखमा:** डॉक्टरसाहेब, म्हणजे परत्येक प्राण्याला कुठला ना कुठला विषाणू ताप देतूयाच म्हणा की.

**डॉक्टर:** अहो, रखमाताई, एकच विषाणू अनेक प्राण्यांनाही ताप देतो, तसेच एकच जीवाणूसुद्धा. आणि वेगवेगळ्या प्राण्यांमध्ये आजार निर्माण करणारे त्या त्या जनावरांपुरतेच जीवाणू, विषाणू, एकपेशीय जीव, परजीवी असे सगळे असतात बघा.

**अक्कासाहेब:** म्हणजे टोळ्याच म्हणायच्या की या प्राण्यांच्या शरीरात धुडगूस घालणाऱ्या ?

**डॉक्टर:** अगदी बरोबर.

**अक्कासाहेब:** मग डॉक्टरसाहेब हा लंपी चर्मरोगाचा विषाणु नेमका कोणकोणत्या प्राण्यांमध्ये हा आजार पसरवतो?

**डॉक्टर:** अक्कासाहेब, LSD अर्थात Lumpy Skin Disease किंवा लंपी चर्मरोग हा विषाणूंमुळे होणारा आजार प्रामुख्याने गाई, अगदी खूपच कमी प्रमाणात म्हशी यांच्यात दिसतो. हा LSD Lumpy शेळ्या मेंढ्यांना होत नाही. त्यांना होणारे देवीचे अर्थात pox आजार वेगळे.

**रखमा:** अन् डॉक्टरसाहेब, हा लंपी जनावरांकडनं माणसास्नी बी हुतूय का?

**डॉक्टर:** नाही, नाही, रखमाताई, लंपी जनावरांकडून माणसांना अजिबात होत नाही.




महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
पशुधन हिताय: बहुजन सुखाय:

जलबिंदू चमकती स्फटीकापरी
बरसता श्रावणातल्या सुफेनसरी
चोचीमध्ये धरोनि तृणपाती अलगद
खोपा स्वप्नांचा विणती सुगरण!

मुक्या हुंदक्यांची परिभाषा जाणणारा पशुवैद्यक केवळ उपचारांची ऋचा आपल्या हाती बाळगत नाही, तर चिमण्या पाखरांच्या सर्जनशील अभिव्यक्तीची नोंदही आपल्या लेखी संग्रहित करतो. पशुसंवर्धन आयुक्तालयाच्या भोवताली बहरेल्या हिरवाईला व सुगरणीच्या कल्पक प्रयत्नांना कॅमेऱ्यात टिपले आहे डॉ. प्रशांत भड (उपआयुक्त पशुसंवर्धन) यांनी.

पशुसंवर्धन आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११०६७